“ वाच म्हणजे कळेल ”—आल्फ्रेडची माता.

# नवीन मराठी निबंध

## भाग पहिला

[ मराठी भाषेच्या कोणत्याहि विद्यार्थ्यास उपयोगी ]

तालुका ..........
..........
नों. दि.

लेखक

विश्वनाथ गणेश गाडगीळ,
पायोनियर हायस्कूल, माटुंगा.

माधव श्रीपाद देव,
चिकित्सक समूह, शिरोडकर हायस्कूल, गिरगांव.

लक्ष्मण दत्तात्रय बेंवळकर,
[illegible] जॉर्ज इंग्लिश स्कूल, दादर.

REFBK-0007920

विषय निबंध
सं. नं. २५८

★

नोव्हेंबर १९५२ ]

[ एक रुपया फक्त

"वाच म्हणजे कळेल"—आल्फ्रेडची माता.

# नवीन मराठी निबंध

## भाग पहिला

[ मराठी भाषेच्या कोणत्याहि विद्यार्थ्यास उपयोगी ]

अनुक्रम ७८०० / विभाग ८९८ क्रमांक नों. दि. १२.५.४७ ... वाचनालय

लेखक

विश्वनाथ गणेश गाडगीळ,
पायोनियर हायस्कूल, माटुंगा.

माधव श्रीपाद देव,
चिकित्सक समूह, शिरोडकर हायस्कूल, गिरगांव.

लक्ष्मण दत्तात्रय बेंबळकर,
किंग जॉर्ज इंग्लिश स्कूल, दादर.

७९२० 

REFBK-0007920

नोव्हेंबर १९५३ ] [ एक रुपया फक्त

# अनुक्रमणिका

१. **प्रवासवर्णन**...१ ( १ ) माझा दौलताबादचा प्रवास....३ ( २ ) माझा आळंदीचा प्रवास....७

२. **आत्मचरित्र**...११ ( १ ) छत्रीची करुण कहाणी....१२ ( २ ) आंधळ्या भिकाऱ्याचें आत्मवृत्त....१४ ( ३ ) रुपया व पैसा यांचें आत्मवृत्त....१६

३ **स्थलवर्णन**...१८ ( १ ) माझी शाळा [ शाळेकडे परतून पहात असतांना ]...१९ ( २ ) शिवनेरी किल्ला....२१

४ **चरित्र**...२४ ( १ ) तुकाराम-चरित्र...२५ ( २ ) श्री. नरसिंह चिंतामण केळकर....२८

५ **कल्पनाप्रधान निबंध**...३० ( १ ) मला एक लाख रुपये मिळाले तर—...३१ ( २ ) मी मंत्री झालों तर—...३४

६ **कथन**...३६ ( १ ) एक अपघात...३८ ( २ ) मी पाहिलेला एक हुतुतूचा सामना...४०

७ **चिंतन**...४३ ( १ ) दारूबंदी...४४ ( २ ) आपण आपल्या पूर्वजांपेक्षां अधिक सखी आहोंत काय ?...४७

८ **मंडन**...४९ ( १ ) इतिहास...५० ( २ ) प्राचीन मराठी काव्यें...५२

९ **खंडण**...५५ ( १ ) इंग्रजी हीच अखिल भारताची भाषा असली पाहिजे. ...५६ ( २ ) अस्पृश्यता हा हिंदुधर्मावरील कलंक आहे...५८

१० **सुवचनांवरील निबंध**...६० ( १ ) नुपेक्षी कदा रामदासाभिमानी...६१ ( २ ) उद्योगाच घरीं ऋद्धि सिद्धी पाणी भरी...६४

मुद्रक—**भ. पं. सोमण,** मॉडर्न प्रिंटिंग प्रेस, ३९१ नारायण, पुणें २.

प्रकाशक—**रा. द. वेंबळकर,** जगत्‌निवास, एल. जे. रोड, मुंबई २८.

# नवीन मराठी निबंध : (भाग १ ला)

## थोडें सांगावयाचें आहे

हे निबंध लिहून आम्ही मराठी विद्यार्थ्यांना निबंध कसे लिहावेत, तें सांगण्याचा प्रयत्न करीत आहोत. Example is better than precept या उक्तीप्रमाणें ते निबंध आम्हाला योग्य वाटतात त्या पद्धतीनें लिहून दाखविलेले आहेत. विद्यार्थ्यांनीं या निबंधांच्या लेखनाचें अनुकरण केल्यास कांहीं दोषास्पद घडेल, असें मुळीं सुद्धां आम्हाला वाटत नाहीं.

दुसरें असें : या 'निबंधांत' निरानिराळे असे '**दहा प्रकार**' दाखविलेले आहेत. प्रत्येक प्रकार लिहितांना त्यांतील पद्धतीचा भर मुख्यत्वें कशावर असावा, याचेंहि थोडक्यांत दिग्दर्शन केलेलें आहे. हे प्रकार अनेकांना आवडणारे अथवा मान्य होणारे नसले, तरी ते लेखनाच्या सोईसाठीं कल्पिलेले आहेत. मुख्यतः **भर आत्माविष्काराला** आहे. '**मला कांहीं सांगावयाचें आहे, सांगण्यासारखें मजजवळ कांहीं आहे,' असें पुष्कळ विद्यार्थ्यांना वाटत असतें. पण त्यांना तें कसें प्रगट करावें,** तें **समजून येत नाहीं.** त्यांच्यासाठीं हे अनेक प्रकार व तत्संबंधीं विवेचन आवश्यकच ठरत असतें. वर्गांत लिहावयाला निबंध दिला कीं कांहीं तरी दिव्यच करावयास आपणांस सांगितलें आहे, असें त्या विद्यार्थीवर्गास वाटत असतें. त्यांना विचार स्फुरतच नाहींत. मग ते शिक्षकांनाच भंडावून सोडतात 'मुद्दे सांगा'. हेंच शिक्षणशास्त्राच्या प्रौढ भाषेंत सांगावयाचें म्हणजे 'त्या विषयावर चर्चा करावयाची आणि विषयाचें सम्यक्ज्ञान करून द्यावयाचें.' हा खटाटोप करण्याचें कारणच असें कीं, '**मुलांचे मूळ वाचनच कमी; पाठांतर त्याहून कमी; आणि आपले विचार आपण लिहून तरी पहावेत, ही प्रवृत्ति तर फारच कमी.**' आणि पहिल्याच लेखनांत विद्यार्थी हतबुद्ध झाला, कीं त्याच्यामध्यें न्यूनगंड उत्पन्न होतो. 'आपणाला येत नाहीं, आपणाला येणारच नाहीं' अशी भावना दृढतर होत जाऊं लागते. परीक्षेपुरता कांहीं तरी 'खरकटण्याचा' निबंध लिहिण्याची प्रवृत्ति बळावत जाते. **बाजारांत उपलब्ध असलेल्या कांहीं निबंध-पुस्तकांतून कांहीं निबंध मुखोद्गत करण्याची** प्रवृत्तिहि उत्पन्न होते.

**कांहीं ठराविक सांच्याचे निबंध पाठ करण्याची** पद्धति तर **फारच घातुक** आहे. त्यामुळें विषयाचा विकास होत नाहीं, भाषेचा विकास होत नाहीं आणि **विचाराचाहि विकास होत नाहीं.** सर्वत्र अर्धवटपणा माजून राहातो. कुबडीवरच अवलंबून रहावें लागतें सदोदित. यासाठीं या **निबंधांत** निबंध प्रत्यक्षच लिहून दाखवून ' आम्हालाहि असे विचार मांडतां येणें शक्य आहे, ' अशी विद्यार्थीवर्गाची सुप्त शक्ति जागृत केलेली आहे. **विचारांचा कोतेपणा किंवा अपुरेपणा इतर ग्रंथकारांच्या ग्रंथांतील मजकुराच्या वाचनानें नाहींसा करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या ग्रंथांतील सर्वच भाग नसेल कदाचित् त्या विशिष्ट पद्धतीचा.** पण तो ग्रंथ त्यांतील एका विशिष्ट लेखासाठीं वाचला जाईल, हा काय थोडा लाभ आहे ? **मुलें याप्रमाणें ग्रंथवाचन हौसेनें करितात असा दीर्घ अनुभव आहे. मुलें वाचीत नाहींत असें नाहीं; त्यांना वाचावयाला मिळत नाहीं, अशी खरी तक्रार आहे.** ती हौस पुरविण्याची मनीषा बाळगून आम्ही ग्रंथांची यादी सोबत त्या त्या ठिकाणीं जोडलेली आहे. आतां ' मुद्दे ' द्यावयास नकोत किंवा त्या विषयावर ' चर्चा करीत ' बसावयास नकोत. दिलेल्या विषयाप्रमाणेंच लिहितां येतील असे कांहीं विषय सुचविलेले असल्यामुळें दुसरीकडे शोधाशोध करण्याचे श्रमहि वांचविले आहेत.

आणखी थोडेसें राहिलें होतें. तें करण्याचीहि आमची इच्छा होती. **पण वेळ नाहीं आणि परवडणारहि नाहीं** म्हणून ती कल्पना आम्ही आवरून घेत आहोंत. मूळच्या कल्पनेपेक्षां हा निबंधांचा संग्रह बराच लहान होत आहे, याचेंहि कारण वरीलप्रमाणेंच आहे. **योगायोगानें पुनः भेटण्याची** वेळ प्राप्त झाली तर आम्ही ती कल्पना पूर्णपणें मांडण्याचा प्रयत्न करूंच करूं आणि **अधिक निबंधांची हौसहि पुरवूं**, एवढेंच आश्वासन या वेळेस देऊन आम्ही थांबत आहों.

जगत् निवास
मुंबई २८
ता. १७-११-१९५३
प्रबोधिनी एकादशी

आपले नम्र,
**लेखक**

मित्रवर्य

श्री. भास्करराव एस. वैद्य,

एम्. ए., बी. टी.

यांसी

घे कृतज्ञतेचे हे अश्रू दोन पिऊन.

नों. दि.
५८२०

# १. प्रवासवर्णन.

## (१) माझा दौलताबादचा प्रवास. (२) माझा आळंदीचा प्रवास.

कसें लिहाल ?

या निबंधांत कथन असतें, वर्णनहि असतें. परंतु प्रवासमार्ग जो असतो **आणि त्या प्रवासांत स्वतःला आलेले जे बरेवाईट अनुभव असतात त्यांना जास्त महत्त्व असतें.** अनुभव सांगितलेले नसतील किंवा ते रसभरीतपणें सांगितलेले नसतील, तर त्या प्रवासवर्णनाला फारशी किंमत मिळणार नाहीं.

या तऱ्हेचे निबंध लिहितांना **प्रत्यक्ष प्रवास केलेल्याच स्थळाची निवड करणें योग्य होय.** त्या स्थलासंबंधीं वाचलेली तरी माहिती पाहिजे, ऐकलेली तरी माहिती पाहिजे. **आपले अनुभव रसरसून सांगतां आले पाहिजेत.** आपले अनुभव वाचून इतरांना त्या स्थलाचें प्रत्यक्ष दर्शन व्हावयास पाहिजे.

प्रवासस्थलाची **ऐतिहासिक माहिती प्रसंगाला साजेल एवढीच आवश्यक आहे.** नाहीं तर स्थलवर्णन होईल किंवा ज्ञानकोशांतील इतिहासवृत्तांत होईल. प्रवासाचा मार्गच सांगत राहिलें, तर भूगोलाचा नकाशा बरोबर बाळगावा लागेल. मात्र या सर्वांची आवश्यकता नाहीं असें नव्हे. पण त्यांचें स्थान गौणच !

अनुभवाला महत्त्व असल्यानें प्रवासस्थळांतील अमक्याच एका विभागावर खिळून रहाणें झालें, तर तें अयोग्य ठरणार नाहीं. **प्रमाणबद्धता असणें आवश्यक आहे,** पण ती नसेलहि एकादे प्रसंगीं. तो दोष आहे, पण तो गौण समजला पाहिजे.

प्रवासमार्गाचा क्रम राखिला पाहिजे. हकीकती मागेंपुढें होऊं नयेत. **क्रम**

**जर साधला गेला नाहीं, तर आपल्या अनुभवाचा ठसा स्पष्टपणें उठणार नाहीं.** वरखालीं सारखें जाण्यानें जसे हेलपाटे जास्त होतात आणि श्रमच जास्त होतात, त्याप्रमाणें प्रसंगक्रम विपरीत होत राहिल्यास ठसे अस्पष्टच उमटत रहातात. म्हणून फार काळजी घेतली पाहिजे. **या दृष्टीनें कांहीं भाग गाळले गेले, तर त्याची आठवणहि करीत बसूं नये.**

त्या दृष्टीनें पुढील क्रमानें मांडणी केल्यास बरें पडेल. प्रवासाची आवड, प्रवासाला सवड, प्रवासस्थलाची निवड, त्यासाठीं साधनांची जमवाजमव.

प्रत्यक्ष प्रवास. **प्रवासांतील बऱ्यावाईट एक दोन आठवणी.**

प्रवासस्थलाचें वर्णन. दर्शनीय भाग आणि सुसंगतरीतीनें प्रत्येक विभागाचें वर्णन. या वेळेला क्रमास फार महत्त्व आहे. मागें असतांना एकादी पुढची हकीकत वर्णूं नये; किंवा पुढें गेल्यावर मागची वस्तु वर्णीत राहूं नये. चलच्चित्रपटांत ज्याप्रमाणें एकामागून एक सुसंगत देखावे दाखवितात, त्याप्रमाणें या शब्दचित्रांत असावें.

**मनावरील संस्कार.**

परत मुक्कामीं.

## हे असले विचार कोठें सांपडतील ?

१ माझा काश्मीरचा प्रवास; २ माझा म्हैसूरचा प्रवास; ३ माझा विलायतेचा प्रवास ( हे पुष्कळ लेखकांनीं लिहिलेले आहेत. ; ४ विलायतेचीं बातमीपत्रें; ५ ब्रह्मदेशांतील मुशाफरी; ६ धुक्यांतून लाल ताऱ्याकडे; ७ रायगड - ठाकरे; ८ माझा उत्तर हिंदुस्थानांतील प्रवास; [ इंग्रजीमध्यें असलीं पुस्तकें शेकडों आहेत. ]

## हें लिहून पहाल कां ?

१ माझी मुंबईची पहिली खेप; २ माझ्या खेड्याकडे; ३ मीं पाहिलेलीं कोरीव लेणीं—आजिंठा, कार्ले-भाजें किंवा बोरीवली येथील. ४ आमची घारापुरीची सफर; ५ एकाद्या ऐतिहासिक स्थळाचा प्रवास.

# ( १ ) माझा दौलताबादचा प्रवास

" बच्चा, स्वामीजींना भेटशील ? ते फार दूर आहेत. गडावर आहेत. आशीर्वाद घे त्यांचा. तुझें कल्याण होईल. " स्वप्नांतील गोष्टी खऱ्या असतात, कां खोट्या असतात कोणाला ठाऊक ? पण मला वरील स्वप्न पडलें आणि मी जागा झालों. हे कोण स्वामी ? कोणत्या गडावर राहातात ? सज्जन गडावरील रामदासस्वामी तर हे नव्हेत ?

अशा विचारांच्या तंद्रींत मी डोळे चोळत बिछान्यावर बसलों होतों. इतक्यांत टपालवाला आला व पत्र टाकून गेला. मी मोठ्या उत्कंठेनें तें पत्र वाचलें. तें माझ्या एका मित्राचें पत्र होतें. तो औरंगाबादला राहातो. " ठरल्याप्रमाणें मे महिन्याच्या सुट्टींत माझ्याकडे येण्यास विसरूं नकोस " असें पत्रांत त्यानें बजावून सांगितलें होतें.

अगोदरचें स्वप्न व नंतरचें हें पत्र — यांचा मेळ काय असावा, असा विचार केला व तपासांतीं ठरविलें कीं, औरंगाबादला जावयाचें व जवळच असणारा दौलताबादचा देवगड किल्ला पाहावयाचा. त्याच गडावर जनार्दन स्वामींची समाधि आहे. आपोआपच त्यांचें दर्शन घडेल.

सुट्टी सुरूं झाली. दुसरे दिवशीं प्रवासाचें सामान बांधून घेतलें व निघालों. जी. आय्. पी. रेल्वेनें दौंड स्टेशनवर आलों. गाडी बदलावयाची होती. एक तास अवकाश होता. फलाटावर तपकिरीची डबी काढून शिंका देत बसलों. एक गृहस्थ माझ्याजवळ आला आणि त्यानें माझ्याकडे तपकीर मागितली. मी तपकीर दिली आणि दोघांची दोस्ती जमली. " व्यसनेषु सख्यम् " म्हणतात ना !

बोलतां बोलतां माझा बेत मी त्याला सांगितला. त्याचे लहानपणाचे पूर्वीचे अनुभवच जागे झाले आणि त्यानें मला एका दगडानें अनेक पक्षी एका टोलींत कसे मारावेत हें शिकविलें. " जवळच निजामशाहीचें अहमदनगर आहे. तेथें चांदबिबीचा महाल पहाण्यालायक आहे. पुढें १६००० वर्षें मृत्यूला दाद न देणारा चांगदेव पुणतांब्याला पहावयास मिळेल. नंतर दौलताबादचा देवगड पाहातां येईल. औरंगाबादहि कमी सुंदर नाहीं. " बिबीका मुकबी " नांवाचा प्रति-ताजमहाल तेथें आहे. जवळच कांहीं मैलांवर एकनाथांचें पैठण आहे. किती

भरला तरी भरला न जाणारा पण चंदन-धारी माधवाच्या एका कावडीनें वाहूं लागणारा नाथांचा रांजण तेथें पहावयास मिळतो. आणखीहि नेट धरून जाशील तर जगप्रसिद्ध वेरूळचीं लेणीं पाहशील व डोळ्याचें पारणें फेडशील. या भागांत तूं पुन्हां पुन्हां येणार नाहींस. पाहून घे मी सांगतों तें. एका दमांत इतक्या सर्व गोष्टी पाहिल्याची स्मृति जीवनांत कायमची वास करून राहील." गाडी आली व मी मोठ्या प्रेमानें व आदरानें त्याचा निरोप घेतला.

हवेनें भरलेला फुगा जसा सहज आकाशांत चोहोंकडे उड्डाण करून येतो त्याप्रमाणें मित्राच्या सल्ल्यानें प्रस्फुरलेल्या या जीवानें सर्व ठिकाणें पाहिलीं व मनसोक्त आनंद लुटला.

दौलताबाद जसजसें जवळ येऊं लागलें, तसतशीं दौलताबादचीं चित्रें मनापुढें खेळूं लागलीं. रामदेव, शंकरदेव, अल्लाउद्दिन, आणि मिठाचीं पोतीं दिसूं लागलीं. पण याहीपेक्षां जास्त आनंद आपणांला आतां अखिल हिंदुस्थानची एके काळची राजधानी पहावयास मिळणार म्हणून वाटत होता. वेड्या महंमदानें आख्खी दिल्ली उचलून या देवगडाला आणली होती व मोठ्या अभिमानानें दौलताबाद असें नांव दिलें होतें. किती रुबाब असला पाहिजे या दौलताबादचा !

एका प्रवाशानें मला धक्का दिला आणि सांगितलें, "जनाब, आपलें दौलताबाद आलें." मी बाहेर डोकावून पाहिलें. मला तर कांहीं राजधानीच्या मोठ्या स्टेशनवर आलों आहे असें वाटेना. मीं त्या गृहस्थास म्हणालों, "खांसाहेब, परका मनुष्य म्हणून माझी चेष्टा करतां होय? दौलताबादचें स्टेशन असें कुठें भिकारडें असतें होय?" "मग काय! दिल्ली, आग्रा यांप्रमाणें मोठें स्टेशन याला समजतां काय? उतरा लवकर. नाहीं तर गाडी सुटेल." असें तो बोलला. वेड्या महंमदाप्रमाणें माझी अवस्था झाली. गबाळ उचललें व खालीं उतरलों. तिकीट देऊन बाहेर पडलों. पाहतों तों चार दोन खटारे व पंचवीस तीस माणसांची सारी गर्दी. सरकारी पाहुण्यांचें आदरातिथ्य करण्यास तयार असलेली 'ऑक्सफोर्ड' मला आठवली. मी स्तंभितच झालों.

तीन चार मैल दूर असलेल्या किल्ल्याच्या भोंवतीं असेल ती राजधानी, असें समजून पावलें पुढें टाकलीं. आशा सुटत नाहीं आणि देव भेटत नाहीं, अशी

अनुक्रम
विभाग

गत सुरू झाली. वाट चालतांना वाटावयाचें—या रस्त्यानें, शंकरदेव वडिलांच्या मदतीसाठीं फौजेसह धांवत आला असेल कां? अल्लाउद्दिनानें आपला तळ कोठें दिला असेल बरें? असे कल्पनेचे खेळ खेळत खेळत गडापाशीं येऊन धडकलों.

काय दिसलें मला? नुसता उंच डोकावणारा सडा डोंगरी किल्ला. आसपास वस्तीचें नांव नाहीं. किल्ल्याच्या देखरेखीकरितां फक्त चार पोलिसचौक्या व दोन बंगले. बाकी सर्व सामसूम. कुठली राजधानी अन् कुठलें काय? काळाच्या पोटांत सर्व केव्हांच गडप झालें होतें. फक्त स्वामींचें भगवें निशाण गडावर फडकत होतें. मी त्याला लवून नमस्कार केला व म्हटलें, "जीवनांत भगवा रंगच शेवटीं टिकाऊ ठरतो ना? इतर सर्व वैभव क्षणभंगुर. माणसाच्या कितीहि प्रचंड कृती असूं द्यात, विश्वाच्या पसाऱ्यांत त्या वाळूवरील रेषा."

पण साहारांत कांहीं ओॲसेस असतातच. 'मोडकें मुसळ उतरंडीलाहि भारी,' असें म्हणतात. उरल्या किल्ल्याचे अवशेष पूर्वीच्या कर्तृत्ववान् पुरुषांचे पराक्रम पुन्हां पुन्हां नजरेपुढें आणून आपणांस उल्हसित करतात हें काय थोडें आहे? दुष्टांच्या दुष्ट कृतींची आठवणहि मेल्या माणसांमध्यें चैतन्य उत्पन्न करते व तेजस्वी हालचाल करावयास लावते. देवगड अशा अनेक खळबळींचें ठिकाण आहे.

पहा तो लोखंडी सुळ्यांचा दरवाजा. अनेक हत्तींनीं त्यास टकरा दिल्या असतील व आपल्या गंडस्थळांतील मद पाजला असेल. तो आतां खिळखिळा आणि लुळापांगळा असेल. वार्धक्यांतील शरिराची कांब यौवनांतील पीळ दाखविल्याशिवाय राहील कां?

ती पलीकडे पहा, धड मशीद नाहीं, धड मंदिर नाहीं, अशी पांढरी इमारत. मंदिरांतील देव फोडून कां कधीं मशीद बनते? सूडाला जागा करून ठेवली त्यानें. स्वामींचें भगवें निशाणच शेवटीं फडफडत राहिलें ना? मंदिरासमोरच केवढा मोठा हौद आहे! असेल तो आतां कोरडा. पण त्या काळीं हत्ती पोहत होते त्या ठिकाणीं. दिसतात कां वाटेंत दोन्ही बाजूस दोन जुने मनोरे? एका मनोऱ्यावर चढून तो डोलवला, म्हणजे समोरचा मनोराच डुलत असे असें म्हणतात. काय कर्तबगारी असेल त्या काळच्या शिल्पकारांची!

पुढें पहा. एका पाठोपाठ एक असे अनेक खंदक. किती खंदकांतल्या पाण्यांतून शत्रू पैल होऊन येणार ! सर्व खंदक पाण्यानें तुडुंब भरले असतील, त्यावेळीं काय मौज दिसत असेल ! कैलासनाथाच्या भोंवतींचें सापाचें वेटोळेंच वाटतें. इतकेंहि करून शत्रू वर आलाच, तर त्याला बालेकिल्ल्यावर येण्यास भुयाराची अंधारी वाटच चाललें पाहिजे. चांगली एक फर्लांगभर लांब आहे. दिवटी पेटवून घेऊन गेलों असतां आम्हास स्पष्ट कांहीं दिसत नव्हतें. ठिक-ठिकाणीं किती तरी माऱ्याच्या गुप्त जागा. दीन दीन करीत शत्रूंची पुढें सर-कण्याची बिशाद काय ? आणि या वाटेच्या शेंवटीं तोंडापाशीं केलेली व्यवस्था पाहिली म्हणजे तोंडांत बोट घालावेंसें वाटतें. पूर्वीच्या लोकांच्या चातुर्याची कमाल आहे ! बाहेर येण्याच्या तोंडापाशीं एक प्रचंड जाड लोखंडी पत्रा आहे. जेव्हां शत्रू भुयारांतून येणार असें समजतें, तेव्हां हा तवा त्या तोंडावर झांकतात व त्यावर गवताच्या गंजी पेटवून देतात. किती तरी लांब त्याचीं आग त्या भुयारांत जात असेल ! कसा शत्रू पुढें सरकणार व तापला तवा बाजूला सारणार ? किती अवघड गड करून ठेवला आहे ? असा प्रकार दुसरीकडे कोठें आढळणार नाहीं.

या भुयारानंतर बालेकिल्ल्याचा दगडी रुंद तट लागतो. बालेकिल्ल्यांत सुंदर राजवाडा बांधला आहे. अजून तो जशाचा तसा आहे. हजारों सैनिक त्या राजवाड्यापुढील दगडी फरशीवर बसूं शकतात. राहण्याची व पाण्याची भरपूर सुखसोय आहे.

बालेकिल्ल्याच्याहि वरच्या टेकडीवर शंकराचें देऊळ आहे. दुसऱ्या बाजूस जनार्दनस्वामींचें ठिकाण आहे. स्वामींचें ठिकाण म्हणजे एक गुहा आहे. गुहेच्या त्या टोंकाला स्वामींची समाधि आहे व दत्ताच्या पादुका आहेत. तेथें जावयाचें असल्यास गुडघ्याइतक्या पाण्यांतून व अंधारांतून शंभर एक पावलें जावें लागतें. नवीन मनुष्य भितो. पण एकदां पलीकडे गेलें, म्हणजे एकदम आल्हादयुक्त शांतता. दत्ताचें जिवंत स्थान आहे तें. जनार्दनस्वामींना येथें दत्तदर्शन झालें. जनार्दनस्वामी हे एकनाथांचे गुरु व एकनाथ हे मुसलमानी राज्यांतील मुसलमानी अधिकाऱ्यांचे विश्वासू सेवक. पैठणहून गुरुदर्शनाकरितां येथें घोड्यावरून वारंवार येत. मी मोठ्या प्रेमानें व भक्तीनें दर्शन घेतलें — आशीर्वाद

मागितला——साष्टांग दंडवत घातलें—व पुन्हां हें स्थळ या अभागी जीवाला पाहावयाला कदाचित् मिळणार नाहीं म्हणून कष्टानें बाहेर पडलों.

चढावयाला वेळ लागतो; उतरावयाला कुठें वेळ लागतो? सरसर अर्ध्या तासांत खालीं आलों. देवगड सोडलें व औरंगाबादला मित्राकडे आलों.

---

## ( २ ) माझा आळंदीचा प्रवास

माझ्या वडिलांची बदली झाली. घरीं बांधाबांध सुरू झाली. मीही आपली चड्डी व सदरा घडी करून घेतला; वर पाटी व अंकलपी ठेवली व मोठ्या तयारीनें बसलों. काय आनंद वाटत होता त्या वेळीं माझे मनांत! आतां आपण दुसऱ्या गांवीं जाणार. तेथें गम्मत जम्मत पाहावयाला मिळणार. मजाच मजा तेथें होणार. आनंदानें अगदीं बेहोष झालों होतों. ल्हानपणापासूनच मला प्रवासाची आवड आहे.

'केल्यानें देशाटन...मनुजा चातुर्य येतसे फार॥' असें एक विद्वान कवी म्हणतो. मी आतांपर्यंत केलेले सर्व प्रवास आठविलें व त्यांचा आपणांस काय उपयोग झाला, ह्याचीही मोजदाद केली. माझी खात्री झाली कीं, आपल्या ज्ञानांत भर पडली आहे व माझ्या वागणुकीवर त्यांचा परिणाम झाला आहे.

एके दिवशीं— "पुंडलीक वरदा हरि विठ्ठल! श्रीज्ञानदेव तुकाराम" गर्जना ऐकली व पंढरपूर किंवा आळंदी पाहावयाचें ठरविलें. खर्चाच्या दृष्टीनें आळंदी सोयीची आहे, असा आम्ही चार मित्रांनीं विचार करून माहिती जमा केली. मोठी नवलाची गोष्ट कीं, आळंदी दोन आहेत असें आम्हास कळलें. एक देवाची आळंदी व दुसरी चोरांची आळंदी. मला वाटलें आपण चोरांच्या आळंदीलाच जावें. लभ्यांश तरी साधेल. पण माझा मित्र म्हणाला, "बाबारे, आतां तेथें कांहीं नाहीं. पूर्वी तें गांव फार एका बाजूला व दूर पडे; म्हणून चोर तेथें जमून आपली लूट वांटून घेत. आतां या काळांत चोरांचे गांव राहील तरी कां!" साहजिकच देवाच्या आळंदीचा बेत ठरला.

एक सुट्टीचा दिवस गांठून आम्ही चार मित्र आगगाडीनें पुण्यास आलों. बसची सोय होती. त्याचा फायदा घेतला व आळंदी मोटार-स्टँडवर येऊन पोहों-चलों. यात्रेचे दिवस नव्हते. गर्दी नव्हती. तिकिटें विनायासें मिळालीं. मोटारींत चढून बसलों. मोटार चालू झाली आणि आळंदी कशी असेल याच्या तंद्रींत व गप्पा मारण्यांत रंगून गेलों.

पाऊण तास कसा संपला कळालें नाहीं. "ज्ञानेश्वर महाराजकी जय" गर्जना ऐकली व भानावर आलों. मोटारींतील दोन गृहस्थ वरील गर्जना करीत होते व पैसा पैसा नदीच्या पाण्यांत टाकून नमस्कार करीत होते. इंद्रायणी नांवाची लहानशी नदी होती ती. पाणी झुळुझुळू वाहात होतें. नदीला लांबलचक पायऱ्यांचे घाट होते. माणसें त्यांवरून चढत उतरत होतीं. पलीकडे उंच आकाशांत सोनेरी शिखरें चमकत होतीं. सुंदर देखावा होता तो. मोटारीच्या वेगामुळें फार वेळ पाहावयाला आम्हाला तो मिळाला नाहीं.

आमची मोटार स्टँडवर थांबली. सर्वांप्रमाणें आम्हीही उतरलों व पिशव्या खांद्यावर लटकावून रस्त्यानें चालूं लागलों. कोठें उतरावयाचें ? आली पंचाईत. जवळच एक साधाभोळा पताकावाला दिसला. त्याचा फायदा घ्यावयाचें ठरविलें. त्याला नमस्कार केला व आमचा मानसही कळवला. "तुम्ही माझ्या सांगण्या-प्रमाणें वागत असाल तर मी तुम्हांला सर्व आळंदी दाखवतों" असें तो म्हणाला. आम्ही एकदम कबुलीजबाब दिला आणि त्याच्या पाठोपाठ चाललों.

त्यानें आम्हाला एका भव्य इमारतीपाशीं आणलें. तिला मोठा दरवाजा होता व त्या दरवाज्यांत एक लहान दरवाजा होता. त्याला दिंडीदरवाजा म्हणतात.त्यांतून आम्ही आंत गेलों. केवढी.प्रशस्त जागा होती ती ! ५० खणांचा इमला एका बाजूला व ५० खणांचा इमला दुसऱ्या बाजूला. मध्यें १००×५० फुटांचें पटांगण. शेवटच्या भागाजवळ एक मोठी विहीर. चार रहाट होते तिला. भोंवतीं सांडपाण्याची फरशी होती. पटांगणाचे मध्यभागीं तुळशींची व फुलांची छोटी बाग होती. पण आम्हां पांच जणांशिवाय कोणी नव्हतें. व्यवस्था तर चोख; पण वस्तीला माणूस नाहीं. मी तर घाबरून गेलों. मला काशीच्या अप्पया दीक्षिताच्या वाड्याची आठवण झाली. या वारकऱ्यानें आम्हांला एका .भुताटकीच्या वाड्यांत तर आणलें नसेल ! हा वारकरी अप्पया दीक्षितासारखा पिशाच नाहीं ना ? शंका दूर झाली

व आम्हाला कळलें कीं, ही धर्मशाळा आहे आणि यात्रेच्या दिवसांत ही नेहमीं भरलेली असते. अशा लहानमोठ्या धर्मशाळा गांवांत पुष्कळ आहेत.

आम्ही नंतर आपलें सामान एका ठिकाणीं ठेवून दिलें. विहिरीजवळ गेलों. हातपाय स्वच्छ धुतले. नंतर शिणवटा दूर करावा म्हणून वारकरी बंधूजवळ गेलों व म्हटलें " भाऊ, आतां आपण थोडें खाऊन घेऊं व नंतर बाहेर पडूं. आमच्या-जवळचा फराळ तुम्ही खाल्ला पाहिजे. " त्यानें आमच्यापैकीं एकाच्या पाठीवर थोपटलें व म्हटलें, " गड्यांनो, ही तुमची गोष्ट दुसऱ्या प्रवासांत शोभली असती. इथें ही बरी नाहीं. माझें तुम्ही ऐकायचें कबूल केलें आहे. तर चला अगोदर मंदिरांत जाऊन ' माऊली ' चें दर्शन घेऊं व नंतर तुमच्या म्हणण्याप्रमाणें करूं. " गुपचूप आम्ही डबे बंद केले व त्याच्याबरोबर निघालों.

वळणें वळणें घेत त्यानें आम्हांस एका चौकांत आणलें. बाजारच होता तो. पण दुकानें कशाचीं ? तुळशीफुलांची व बत्तासेचुरमुऱ्यांचीं. त्यानें एका फुल-वाल्याजवळून एक पैशाचा बुक्का व पैशाची तुळशीची माळ घेतली. आम्हींहि तसेंच केलें. नंतर मुख्य देवालयाच्या महाद्वारापाशीं आलों. दरवाजा मोठा होता. पायऱ्या बऱ्याच होत्या. पहिली पायरी पितळी पत्र्यानें मढवलेली होती. त्यावर एक मुखवटा होता. त्याच्या पायां पडून पितळी पायरीला पायाचा स्पर्श न करतां चढून मंदिरांत गेलों.

सभामंडपांतून गाभाऱ्यांत व गाभाऱ्यांतून समाधीच्या स्थळीं गेलों. मध्य-भागीं चौरस चौथऱ्यावर लहान लहान दुसरे चौरस चौथरे लगोरीसारखे रचून असलेली समाधि होती. तुळशीफुलांनीं झांकून गेली होती ती. बाजूस दोन उंच समया तेवत होत्या. मागें विठोबारखुमाईची मूर्ती होती. आम्ही प्रत्येकांनीं बुक्का वाहिला व माळ घातली. पण आमच्या वारकऱ्यानें माळ घालून झाल्यावर कडकडून त्या समाधीस मिठी मारली व " माऊली ऽऽ " अशी भक्तिमय आरोळी ठोकली. मी सर्दच झालें. लहानपणीची " आई " म्हणून जिव्हा-ळ्याची हांक आठवली व डोळ्यांतून दोन अश्रू ठिपकले. पवित्र वातावरण होतें तें.

समाधिगाभाऱ्याच्या उजव्या बाजूस एक नंदी आहे व दुसऱ्या बाजूस एक जुनें शिवमंदिर आहे. नंदीच्या खालीं भुयाराचें द्वार आहे व यांतूनच ज्ञानेश्वर आंत शिरले व त्यांनीं जिवंत समाधि घेतली, असा इतिहास आहे.

२

समाधीस उजवें घालून एका मोठ्या पिंपळाजवळ आलों. त्यावर एक पाटी झळकत होती "सोन्याचा पिंपळ". आम्हीं आश्चर्यानें वारकरी दोस्तास विचारलें, "ही काय हकीकत ? सोन्याचा कसला हा पिंपळ ?" त्यानें सांगितलें, "मित्रांनो, ज्ञानेश्वरांच्या मातुःश्रीनें या पिंपळास प्रदक्षिणा घातल्या. साधूंचा "पुत्रवती भव", हा आशीर्वाद येथें मिळाला. तिचा संन्यासी पति परत येऊन तिचा संसार सुखाचा झाला. ज्ञानेश्वरांसारखीं चार मुलें तिच्या पोटीं जन्मलीं. तिला सोन्याचे दिवस या पिंपळामुळें दिसले, म्हणून याला "सोन्याचा पिंपळ" म्हणत असतात. तो खरोखरी सोन्याचा नाहीं, असें आतां तुम्हांला वाटतें कां ?

नंतर आम्ही गांवप्रदक्षिणा केली. वाटेंत चांगदेवाचा गर्व हरण करण्याकरितां ज्ञानेश्वरांनीं चालविलेली भिंत पाहिली. वाटेंत अनेक साधुसंतांच्या समाधीही बांधलेल्या होत्या.

गांवीं सडकेची व्यवस्था बरोबर नाहीं. पण घरोघर पाण्याच्या नळाची सोय आहे. म्युनिसिपालिटीनें दवाखाना काढून मोफत औषधपाण्याचीही सोय केली आहे.

आळंदी हें टुमदार छोटें खेडेगांव आहे. पवित्र वातावरण आहे तेथें. वाटतें परतच येऊं नये तेथून. कवि विनायकानें पोपटावरील कवितेंत काढलेले उद्गार अगदीं योग्य वाटतात. तो पोपट म्हणतो—

मज हाल पुराची काय पांखरां कळे,
परि वदती जगतीं अज्ञानाच कोंदलें,
रसिकता करपली मत्सरानलें
काय अशा या स्थानीं जावें ?

पण प्रवासाला आलेलों मी आळंदीलाच कसा रहागार ? फिरलों आम्ही माघारीं चौघेहि. पण मन तुकारामाच्याप्रमाणें म्हणत आहे--

कन्या सासुऱ्यासी जाये, मागें परतोनी पाहे ॥
तैसें झालें माझ्या जिवा, कधीं भेटसी केशवा ॥

## २. आत्मचरित्र

अनुक्रम १८७०४ दिनांक २८·११·६९ क्रा. २५११९५ ...लय

**(१) छत्रीची करुण कहाणी. (२) आंधळ्या भिकाऱ्याचें आत्मवृत्त. (३) रुपया व पैसा यांचें आत्मवृत्त.**

कसें लिहाल ?

हा कथनपर निबंधाचाच एक प्रकार आहे. तसा कथनात्मकच लिहावयाचा असतो. पण जरा फरक आहे, तो नीट ध्यानांत ठेवला पाहिजे. तो फरक असा—

आत्मचरित्र लिहितांना **महत्त्व आहे तें स्वतःच्याच बदल पावलेल्या हकिकतीला. आपलीच हकीकत सांगावयाची आहे, पण ती आपण स्वतः आणि मूळ अवस्थेपासून कशीं कशीं स्थित्यंतरें पावत आलेली आहे, तशी.** स्थित्यंतरें सांगतांना रसहानी झालेली दिसूं नये. उलट **स्थित्यंतराच्या वादळाच्या लाटांबरोबर इकडे तिकडे हेलकावलें गेलें पाहिजे. चढउतार दिसून आलेला पाहिजे; क्षणांत एक, तर क्षणांत दुसरेंच, असें अनुभवास आलेलें पाहिजे;** आयुष्यक्रमांत निरनिराळे प्रसंग येतात, त्यांची केवळ जंत्रीच न देतां, त्यांचें जिवंत रसरसणारें चित्र स्वतांबरोबरच वाचकांस पहाण्यास सांपडलें पाहिजे.

कालक्रम हा महत्त्वाचा नाहीं असें कोण म्हणेल ? पण त्याची तितकी आवश्यकता या ठिकाणीं नाहीं. **स्थित्यंतरांच्या अवस्थांना महत्त्व आहे. परिवर्तनाला महत्त्व आहे. सुखदुःखाला महत्त्व आहे. त्याच्या प्रसंगोपात्त नीतितत्त्वकथनाला महत्त्व आहे. त्याच्या विचाराच्या दिशेला महत्त्व आहे.** [ कारण कांहीं अवस्थेंतूनच विचार उत्पन्न होत असतात व ते ठामहि होत जात असतात. ] ते विचार योग्य आहेत कीं अयोग्य आहेत याला महत्त्व नाहीं. ती **दिशा** महत्त्वाची आहे.

**वाचकानें त्या जीवनाशीं समरस झालें पाहिजे.** सुखाचे किंवा दुःखाचे विकार त्यालाहि उत्पन्न झाले पाहिजेत, म्हणजे तें आत्मचरित्र पूर्ण झालें असें समजता येईल.

त्या दृष्टीनें आत्मचरित्र लिहितांना खालील सूचना नीट पाहिल्यास बरें होईल. केवळ दिशा दाखविण्यासाठीं सांगितलें आहे—

सुरवात [ ही प्रत्येक निबंधास निरनिराळी असूं शकेल ]. प्रत्येकजण जणुं आपल्या आयुःक्रमाच्या पलीकडील सीमेलगत असल्यानें दुःखाचे उसासे टाकीत सांगत आहे. समाधानाचा सुस्कारा क्वचितच ऐकावयास मिळेल.

उत्पत्तीचा काळ, स्थळ [ शक्य तेथें इतिहासाच्या घटनेला प्रमाण समजून. इतिहासें माहिती नसल्यास मुग्धता स्वीकारावी. कांहीं तरी विपर्यस्त लिहूं नये. ] वाढ [ प्रसार ]. त्या वाढीचीं कारणें. वैभवाचा मध्य.

दैवाची कलाटणी [ चांगली किंवा वाईट. ] उतरती किंवा चढती दशा. सद्यःस्थिति.

शेंवटीं कांहीं मागणी [ देवापाशीं मागणें. ]

**असें लिहिलेलें आणखी कोठें सांपडेल ?**

पं. जवाहरलाल नेहरूंचे आत्मचरित्र; डोंगरीच्या किल्ल्यांतील आमचे १०१ दिवस; आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी; आमचीं गेलीं अकरा वर्षें; स्मरण-सांखळी; स्मृतिचित्रें; अंदमानच्या अंधेरींतून; सत्याचे प्रयोग; कळ्यांचे निःश्वास.

**याप्रमाणें लिहून पहाल कां ?**

१ एका ऐतिहासिक किल्ल्याचें आत्मवृत्त; २ कोहिनूर हिरा आपली हकीकत सांगत आहे; ३ शिरोभूषणांची उत्क्रांति; ४ सोमनाथानें काय सांगितलें ? ५ स्वप्नांत आलेली मोटार; ६ रस्त्यावरील चांभाराची कथा; ७ मोटारीखालीं चिरडलें गेलेलें कुत्रें जबानी देत आहे; ८ रेडियोचें आत्मवृत्त; ९ भवानी तलवारीचें आत्मवृत्त; १० दगडी कोळशाचें आत्मवृत्त.

---

## (१) छत्रीची करुण कहाणी

सप् ! सप् ! सप् ! एक घाव नि दोन तुकडे ! मुळापासून मला छाटलें. एवढें करून तो नराधम थांबला नाहीं. माझी मान मुरगळून त्यानें माझे तोंडास बांक आणला व माझ्या पायाला पत्रासुद्धां ठोकला. वर हंसून काय म्हणतो,

" कशी छान ऐटदार काठी झाली ? " मी दुःखानें होरपळून जात होतें आणि त्याला आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. आसुरी आनंद म्हणतात तो असा.

पण — सकाळीं बायकोला झोडपावें आणि संध्याकाळीं कामावरून येतांना तिच्याकरितां एक सुंदर पातळ आणावें. ती खूष. मला त्यानें एक सुंदर काळा-भोर १८ काड्यांचा झगा आणला आणि नेसवला. मागेंपुढें आंवरसावर करायला ओढणीचीही व्यवस्था केली. माझ्या तोंडावर गुलाबी रंगाची छटा आली. झग्यावर कशिदा काढून घेतला व शरिरावर सुंदर गोंदवलेंहि. आरशांत पाहिलें आणि मी खरोखर सुंदर दिसूं लागलें. मला धन्य वाटलें. मला माहेरची आठवण झाली म्हणजे लाज वाटते. आतां तेथेंच असते तर बांबूच्या बेटांतील खेडवळ वेतच राहिलें असतें. पण मी आतां मुंबईंत राहणारी ऐटदार छत्री झालें आहे.

काय डौल आहे माझा ! अलगज हातावर घेऊन मला फिरावयाला नेतात; अंगाखांद्यावर खेळवतात; म्हाताऱ्यांचा मी आधार आहे; तरुणांचा मी शोक आहे व बालांचें मी खेळणें आहे. पिसारलेला मोर व विस्तारलेली छत्री कोणाला आवडत नाहींत ? तसबिरींत पिसाऱ्यापुढची सरस्वती तुम्ही पाहिली असेल. फार छान दिसते, नाहीं ? मला उघडून खांद्यावर घेऊन चालले म्हणजे मीहि अशीच प्रत्येक माणसास शोभा आणतें. चीन, जपानांत जा, म्हणजे माझें काय कौतुक होतें, तें तुम्हांस समजेल. ब्रह्मदेशांत कधीं गेलां आहांत कां ? " पंखा व छत्री, " हे प्रत्येक स्त्रीचा दागिना आहेत. फार काय ? छत्रचामरामुळेंच राजाला डौल व सत्ता आहे. माझ्यामुळें राजाला श्रेष्ठपणा. — आहे कीं नाहीं रुबाब माझा ?

एकदां आकाश ढगांनीं भरून आलें. वारा वाहावयाचा बंद झाला आणि घरांत गुदमरायला लागलें. मला बाहेर फिरावयला काढलें. किती बरें वाटलें ! पण जेव्हां पावसानें झोड उठवावयाला सुरवात केली तेव्हां माणसानें काय केलें, सांगूं ? मला उघडून डोक्यावर धरलें व आपण आडोशाला शाबूत राहिला. मी मार खाऊन हैराण झालें व भिजून चिंब झालें. माणसाचा कृतघ्नपणा मला आतां समजला. मला तो कां गोंजारत होता तें ह्या वेळीं मला उलगडलें.

असेंच एकदां एका बाईनें माझी भर बारा वाजतां उन्हांत वरात काढली. तापून तापून माझें डोकें पिकून निघालें. तिनें पर्वा केली नाहीं माझी. स्वतःलं

त्रास होऊं नये म्हणून तिनें मला जतन करून ठेवलें होतें. पण हें मला फार उशिरा कळलें.

बेबीनें एकदां मला बाहेर नेलें. ही तरी मला चांगलें वागवील असें मला वाटत होतें. पण व्यर्थ. एक कुत्रें तिच्या अंगावर धांवून आलें. तिनें पट्दिशीं उघडून मला कुत्र्यापुढें धरलें. कुत्रा मला चावला आणि ती सुरक्षित.

मला हे हाल सहन होईनात. आंतून मी किडून गेलें. पहिल्यासारखा मला आतां जोम राहिला नाहीं. मी खिळखिळी झालें. माझा झगा पन्नास ठिकाणीं फाटला. माझी केविलवाणी स्थिति झाली. मला बरेच वेळां डॉक्टरकडे नेलें—निरनिराळे औषधोपचार झाले—फार काय ! पुन्हां दुसरा झगाहि मला आणला. पण झगा पाहिल्याबरोबर डोक्यांत तिडीक उठली. जळो तो झगा आणि जळो तें मुंबईचें नटवें आयुष्य ! माझें बांबूनेताचें बेटच बरें होतें.. सुखी मी असतें तेथें. माझ्या माहेराला मला कोणी पोहोंचतें करील कां ?

---

## ( २ ) आंधळ्या भिकाऱ्याचें आत्मवृत्त

कोण भिकारी नाहीं ? राजासुद्धां भिकारी आहे. मला दोन कच्चाबच्चां-करितां भीक मागावी लागते. सत्तेच्या जोरावर भीक वसूल करतो म्हणून तो राजा. मला लोकांच्या खुषीनें भीक मिळते. मग मी राजापेक्षां श्रेष्ठ नाहीं कां ?

हा माझा टोकरा. द्रौपदीला मिळालेल्या सूर्याच्या थाळीपेक्षांहि हा सरस आहे. सूर्य मावळल्यावर थाळींत कांहीं मिळत नव्हतें. पण माझ्या टोकऱ्यांत मला रात्रींहि मिळतें.

मला परमेश्वरानें आंधळें केलें. किती छान झालें ? पापी माणसांचीं तोंडें पहावयाला नको. आंधळेपणा हेंच माझें भांडवल. परमेश्वरानें तें माझ्याकरितां उभारलें आहे. ह्यामुळेंच लोक माझ्याकडे दयाळूपणानें पाहतात व मला भिक्षा मिळते.

मी कोणाचा बांधलेला नाहीं. वेळेवर कोठें हजर राहाण्याची माझ्या पाठीमागें धास्ती नाहीं. या धास्तीपायीं किती तरी माणसांना जिवाला मुकावें लागतें हें मी डोळे नसूनहि पाहूं शकतों. महिनाअखेर मोठा पगारवालासुद्धां पैशानें कंगाल असतो——शेजाऱ्यास भीक मागतो. पंण मी भिकारी नेहमींच सधन. मला रोज

अखंड पगार. आणि खरें सांगूं ? मी आतांपर्यंत जेवढी बचत केली तेवढी सामान्य माणसाच्या बँकेंतहि नसेल. माझी एका दुकानदाराकडे मोठी ठेवहि आहे.

एकदां एका खट्याळ मुलानें माझी काठी पळवली. काय अवस्था झाली माझी ! ठेंचकाळत व पडत झडत जावें लागलें घरीं. त्या वेळीं मला माझ्या आंधळेपणाचा भारी राग आला. डोळस असतों तर त्या मुलाला पकडून त्याच्या चार थोत्रींत दिल्या असत्या लगावून !

एकदां एक बाई आपल्या मुलाला ओरडून म्हणत होती, " भिकाऱ्यासारखा काय हात पसरतोस ? आणि ते दोन फुटाण्याच्या दाण्याकरितां ? लाज नाहीं वाटत ? चांगला मोठ्याच्या घराण्यांत जन्मला आहेस कीं ... " माझ्या मनांत चर्रर् झालें. भीक ही इतकी कां लाजिरवाणी गोष्ट आहे ? भीक मागणाऱ्याचें घराणें मोठें नसतें ? अरेरे, मग मी भिकारी किती अभागी !

माझा आंधळेपणा व भिकारीपणा नाहींसा होईल कां ? लाजिरवाणें जिणें संपण्याची मला कांहीं आशा आहे कां ? या जन्मांत मी सत्कुलांतला होईन कां ? देवा, या वेळीं तूं मला मरण दिलेंस तर किती बरें होईल ! निदान पुढील जन्मीं तरी मी सर्व गोष्टी साधेन व सुखी होईन.

पुढें—अशा विचारानें वेड्या झालेल्या जिवाला एकदां पकडून एका दूर अज्ञात स्थळीं नेण्यांत आलें. मला सुनवण्यांत आलें कीं, भिकाऱ्यांचा कायदा पास झाला आहे. यापुढें कोणत्याना कोणत्या तरी प्रकारें काम करण्यास लायक असलेल्या भिकाऱ्यास भीक मागण्यास बंदी आहे आणि अगदींच दुर्बल असणाऱ्या भिकाऱ्यास अन्नवस्त्र देण्याची व्यवस्था सरकार करणार आहे.

मी बुचकळ्यांत पडलों. काय होणार आहे तें कळेना. मला पुढें लवकरच दोन चार कला शिकवण्यांत आल्या. मी चांगला डग्गा-तबला वाजवूं शकतों. रेडियो केंद्रावर मला बरेच वेळां जावयास मिळतें व त्याबद्दल वेतनहि मिळतें. मी चटया उत्तम विणूं शकतों. आतां मी माझ्या कर्तबगारीवर जगतों.

मी आतां माझ्या शाळेंत जाणार आहे. मी आंधळा असूनहि लिहावाचावयास शिकणार आहे. मग मला कोण म्हणेल अडाणी नागरीक ? मग सांगा बरें, मी आंधळा कीं डोळस ?

मी आतां आंधळा नाहीं, भिकारीहि पण नाहीं; कोणावर अवलंबूनहि पण नाहीं. मला आतां ' चांगल्या कुळांतले ' शब्दहि ऐकावयास येत नाहींत. मला अधिकाची हांव नाहीं, ' अधिक नाहीं ' याची खंतहि नाहीं. आंधळेपणांत पोटासाठीं शिकलेले बोल मी पुनः पुनः मनाशीं उगाळीत असतों. ' ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें, चित्तीं असूं द्यावें समाधान ! ' आणि खरोखरींच मी आतां समाधान पावलेलों आहे. संस्कृत सुभाषित आहे ना ?

आशा नाम मनुष्याणां काचित् आश्चर्यशृंखला
यया बद्धा प्रधावंति, मुक्ताः तिष्ठंति पंगुवत् ॥

तसा मी आतां झालों आहे.

---

## ( ३ ) रुपया व पैसा यांचें आत्मवृत्त

एकदां दोन मित्र फारा दिवसांनीं भेटले. पाहतांक्षणीं लांबूनच धांवत सुटले. एकमेकांना कडकडून त्यांनीं मिठ्या मारल्या व ढळढळा रडले. ओठांतून शब्द निघेना. एकानें बोलण्याचा प्रयत्न केला, तर दुसरा म्हणतो, " थांब, पूर्ण भेटूं दे व भरपूर रडूं दे. नंतर बोलूं. "

प्रेमाचा सोहळा म्हणतात याला. प्रेम दाटतें, तेथें भाषा खुंटते. डोळ्यांतून पाणी वाहूं लागतें आणि सर्व शरीर रोमांचित होतें. परमेश्वराचें दर्शन शब्दातीत आहे म्हणतात, तें खोटें नाहीं. माझा मित्र पैसा मला फार दिवसांनीं भेटला व माझी स्थिति वरीलप्रमाणें झाली. प्रेमाचा पूर ओसरला आणि आम्हीं सुख-दुःखाच्या गोष्टी करूं लागलों.

मित्रा, काय रे सांगूं माझी अवस्था ? पूर्वींचा मी रुपया कोणीकडे ! व आतांचा मी कोणीकडे ? पूर्वीं मी खरा चांदीचा रुपया होतों. मी बोलका राहावें म्हणूनच फक्त माझ्यांत थोडी भेसळ होती. सोळा आणे माझी भरपूर किंमत होती. मित्रा, मला आतां चांदीचा म्हणून कोणी म्हणतात कां रे ? माझी बाजारांत तर किंमत चार आणे झाली आहे. रोजमुरा मिळविणारा गडी-सुद्धां म्हणतो, " धनीसाहेब, एक रुपड्याला मी काम करणार नाहीं. " शिवाजीच्या वेळीं माणसाला महिन्याला दोन रुपये पगार असे. किती जपत

असत मला ! आतां घराचा उंबरठा ओलांडतांना मला हरघडीं कडोसरीं घेतात. बाजारांत गेल्यावर दोन वस्तूंत आणि दोन क्षणांत माझा चक्काचूर

माझा चेहरा तरी पहा, कसा काळवंडला आहे. मला आतां वाजवून पहावयाचा नाहीं. त्यामुळें माझें तोंडहि बंद झालें. कोणापाशीं व कसें माझें हृदय उकलून दाखवूं ? तोंड दाबून बुक्क्यांचा मार सुरू झाला आहे. नट-सुद्धां माझ्याइतके चेहरेपालट करीत नसेल ! महाराणी गेली. सातवे एडवर्ड झाले. पांचव्या जॉर्जचें तोंडसुख पाहिलें. आठवे एडवर्डहि कांहीं काळ नाचले. सहावे जॉर्ज नुकतेच पाठमोरे होऊन परतले आहेत. आणि सध्यां तीन सिंहांचा मुखवटा धारण करून मी फिरतों आहे. या चंचल व लहरी सरकारच्या कारकीर्दींत माझ्या या अवस्थेचा तरी कोठें भरंवसा आहे ?

एवढ्यानें कोठें माझी दैन्यावस्था संपली ? माझा जडपणाहि काढून घेण्यांत आला. मला हलके बनविलें. मला कागदाचें चिटोरें केलें. एका श्रीमंतानें अशा चिटोऱ्यांचा ढीग जाळून त्यावर चहा केला. दुसऱ्या एकानें माझ्यांत तबाखू भरून सिगारेट तयार केली व खुशाल मला पेटवून धूर सोडीत बसला. काय हाल राहिले आहेत माझे शिल्लक ! 'जळलं तोंड मेल्याचें' असा शाप तर कोणी मला दिला नाहीं ना ?

माझा मित्र पैसा धाडकन् बाजूला सरला आणि उद्गारला, " बावळटा, हेंच काय आपण लहानपणीं शिकलों ? वाटेल ती परिस्थिति येवो, नंदनवन समजून पुढें सरकलें पाहिजे. श्रीरामाचा काळ काय चांगला गेला ? शिवछत्रपतींचें जीवन काय पुष्पवाटिकेंतून चाललें होतें ? जन्माला आलेल्या माणसाच्यामागें शनीच्या पीडा सारख्या असावयाच्याच. विक्रमादित्य होण्यांत खरा पुरुषार्थ आहे.

" पहा माझ्याकडे. दिसतों कां तुला मी पूर्वीप्रमाणें ऐसपैस ? पुष्कळच रोडका झालों मी. पण मला नाहीं वाईट वाटत. उलट बरेंच झालें. हें पहा माझें पोट. आरपार खळगा पडला आहे. आंतड्याचें सुद्धां बलिदान केलें. इतरांच्या सुखा-करितां कोणीतरी झीज सोसायला नको कां ? सैनिक समरांगणावर प्रत्यक्ष जीवदान नाहीं कां करीत !

" मला वायसर समजून लोकांनीं खिळे ठोकले म्हणजे प्रभू येशूची मी

आठवण करतों. बाजारांत मला कुठें किंमत आहे? एक आण्याशिवाय वस्तू मिळत नाहीं. पण मला त्याचें मुळींच वाईट वाटत नाहीं. गरिबाच्या कटोऱ्यांत मी पडतों. सत्यनारायणाच्या पूजेसाठीं माझा मान. मुलांचे लाड व समजूत माझेमुळें. बस्स झालें. आनंद तरी किती मिळवावयाचा?

"विश्व हा आरसा आहे. त्यांत पाहशील तसें तुला दिसेल. रडक्याला रडकें दिसेल. हंसऱ्याला सर्व हंसरें दिसेल. दुःख चिखल समज. त्यांतून आनंदाचें कमळ निर्माण कर. त्याग करावयाला शिक. आनंद सांवलीसारखा मागें धांवत येईल."

---

# ३. स्थलवर्णन

## ( १ ) माझी शाळा [शाळेकडे परतून पहात असतां.]

## ( २ ) शिवनेरी किल्ला.

कसें लिहाल ?

स्थलाचें ऐतिहासिक किंवा भौगोलिक स्थान सांगावें. प्राचीन हकीकत [ असल्यास व माहिती असल्यास ] सांगावी. त्या स्थलाच्या महत्त्वाच्या भागाचें वर्णन करावें. **या वर्णनांत रसोत्कट आठवणींचा समावेश व्हावा. या आठवणी दंतकथात्मक असल्या तरी चालतील.** त्या स्वतांच कल्पून लिहिल्या तरी कांहीं हरकत नाहीं. त्या विभागाचें वर्णन करीत असतां विभाग क्रमवार असावेत असा कटाक्ष ठेवावा.

त्या स्थलाकडे जाण्याचा प्रवासमार्ग—अगदीं स्थूल. नाहीं तर तें प्रवासवर्णन होऊं लागेल.

**शेवटीं मनावर उमटलेला जो ठसा असेल, तो सांगावा** आणि समारोप करावा.

असें लिहिलेलें आणखी कोठें सांपडेल ?

केसरींतून नुकतेच आलेले दोन लेख : कनकेश्वर, (के. ता. २९-४-५१)

आणि आजि म्यां सिंह पाहिला—न. वि. गाडगीळ. महाराष्ट्रांतील किल्ले—शि. म. परांजपे. पं. महादेवशास्त्री यांचा तीर्थरूप महाराष्ट्र इ.

याप्रमाणें लिहून पहाल कां ?

१ मी मलबार हिलवरून पाहिलेली मुंबई; २ सांताक्रूझचा विमानतळ; ३ गोल घुमट; ४ काशीक्षेत्र; ५ राणीचा बाग; ६ रेल्वे वेटिंग रूममधील एक रात्र, इ.

## ( १ ) माझी शाळा

( शाळेकडे परतून पहात असतांना )

आज इतक्या वर्षांनीं मी माझ्या शाळेची आठवण करीत आहे. पण याचा अर्थ असा नव्हे कीं माझ्या शाळेला इतके दिवस मी विसरून गेलों होतों. ती शाळा इतकेहि दिवस माझ्या अंतःकरणांत विलसत होतीच. पण आज त्या विलसण्याला प्रगट होण्याचा प्रसंग प्राप्त झाला, एवढेंच.

माझी शाळा ! व्हिक्टोरिया ज्युबिली हायस्कूल, हें तिचें नांव. राणी व्हिक्टोरियाच्या हीरकमहोत्सवाच्या वेळेपासून स्थापन झाली असा इतिहासाचा दाखला आहे. दुमजली इमारत आणि दगडी ! ऐस पैस होती ती त्या काळीं. आज तिच्या भोंवतालचें नियंत्रक ( कांपाउंड ) काढून टाकलेलें आहे. रस्ताहि मोठा करण्यांत आलेला आहे. आवारांत पाण्याचे हौद बांधलेले दिसत आहेत आणि बगीचा असावाच म्हणून चार खुरटीं झाडें तेथें दिसत आहेत.

माझी शाळा ! एका बाजूला मारुतीचें मंदिर, दुसऱ्या बाजूला चंद्रभागा नदीचा कांठ. एका बाजूला गांवकऱ्यांची रखवालदार म्युनिसिपालिटी आणि समोरच्या बाजूस स्पर्धा करण्यासाठींच जणूं जमिनींतून वर आलेली दुसरी एक इंग्रजी शाळा. 'आपटे स्कूल' असें आम्ही तिला म्हणत असूं.

माझी शाळा ! मी जेव्हां जेव्हां पंढरपुरास जातों, तेव्हां तेव्हां त्या शाळेला भक्तिपुरःसर वंदन करतों. एक वेळ मी चंद्रभागेंत स्नान करणार नाहीं, एक वेळ मी विठ्ठलाच्या मंदिरांत जाणार नाहीं, पण माझ्या शाळेच्या शीतल छायेंतून एकदां तरी फिरल्याशिवाय मी कधींहि राहाणार नाहीं. मला चैनच पडत नाहीं.

माझी शाळा ! त्या शाळेंत मी इंग्रजी चौथीपासून तों सातवीपर्यंत चार वर्षें होतों. माझे वर्ग मला आठवतात. त्या वर्गांतील माझ्या बसण्याच्या जागा मला आठवतात. मी केव्हां केव्हां शाळेच्या परिसरांत शिरतों तेव्हां कांहीं तरी निमित्तानें त्याच जागेवर बसण्याचा प्रयत्न करतों. पण त्यांतहि मी कोठें बसलों आहे आणि तेथेंच कां, याचें कारण दुसऱ्या कोणाच्या लक्ष्यांत येऊं नये यासाठीं मी फार जपत असतों.

माझी शाळा ! त्या ठिकाणचा तो ड्रॉइंग हॉल ! सर्वांच्या जणुं शिखरावर विराजमान झालेला. मला चित्रकलेची आवड होती. मी त्या वेळीं बऱ्यापैकीं चित्रें काढीत असें. माझ्यावर माझे चित्रकला शिक्षक जसे प्रसन्न तसे अप्रसन्नहि नव्हते. त्यांचा एकदां मारहि खाल्लेला मला आठवतो. ज्या जागेवर मी त्या वेळीं होतों, ती जागाहि मला आठवते आहे. मार खाल्ला तो शेजाऱ्याला उपकार करण्याच्या नादासाठीं; माझ्या चित्रचुकीबद्दल नव्हे. त्याबद्दल मला अभिमानहि जसा वाटत नाहीं, तसा विषादहि वाटत नाहीं. आठवण मात्र अजून त्याची बुजलेली नाहीं.

माझी शाळा ! त्यांतील मराठी शिकवणारे शिक्षक मजवर फार लोभ करीत. वास्तविक पहातां मी कोणा एकाच शिक्षकाचा आवडणारा होतों असें मुळींच नाहीं. मजवर गुरूची कृपा पूर्णपणें होती आणि ती अद्यापहि उरलेली आहे हें सांगतांना मला अभिमान वाटत आहे.

आम्ही त्या वेळीं सातवींत नुकतेच आलों होतों. संस्कृत शिकवणारे शिक्षक वारंवार बदलले जात होते. इन्स्पेक्शन जवळ आलेली. परीक्षाहि जवळ आलेल्या आणि कॉंपोझीशन्स् कांहींच झालेलीं नाहींत. तेव्हां हेडमास्तर इत्यादिक सर्व घाबरून गेले. त्या काळचे इन्स्पेक्टर्स आजच्यासारखे नेभळट नव्हते. इन्स्पेक्टरची स्वारी म्हणजे भीतीचा गोळाच उठावयाचा त्या काळीं सर्व अधिकारी वर्गाच्या पोटांत. आणि ही तर अक्षम्य चूक. त्या वेळेस देवासारखे असणारे आमचे काणे मास्तर उत्स्फूर्त पुढें आले. मॅट्रिकच झालेले, पण संस्कृतवर प्रभुत्व. त्यांनीं आमच्या दोन्ही तुकड्यांचे तास कांहीं काळ घेतले. सत्तर मुलांचा एक वर्ग म्हणजे केवढा विस्तीर्ण ! आणि त्या वर्गांत त्यांनीं श्लोक शिकवावेत, त्यांनीं ते गाऊनहि घ्यावेत. त्यांचा तो एका बाजूचा मोठा वर्ग आणि इतकीं मुलें आणि संस्कृतच्या गाइल्या जाणाऱ्या कविता यांची आठवण, मी ज्या वेळीं आतां वर्ग

७.९२०

घेतों त्या वेळीं होत असते. शिकवीत असतां मी शिक्षक आहे असें मला वाटतच नाहीं. मी जणुं कांहीं त्या काणे गुरुजींच्या तासांतच रमून गेलों आहे असें मला वाटत असतें.

माझी शाळा ! त्या शाळेचें आतां नामांतर झालेलें आहे. लोकमान्य हायस्कूल असें तिचें नवीन नांव आहे. मला त्या नवीन नांवाचा परिचयहि रहात नाहीं. व्ही. जे. हायस्कूल म्हणतांना जें वाटतें तें या नवीन नांव धारण करणाऱ्या त्याच शाळेबद्दल वाटत नाहीं हें खरें आहे. **What is in a name ? There is everything in the name.**

मी माझें येथलें आयुष्य संपवून पुनः परतून त्या शाळेकडे केव्हां तरी येईन अशी आशा मी बाळगून आहे. विद्यार्थी म्हणून मी तिची सेवा केली. अधिकारी म्हणून त्या शाळेची सेवा करण्याची मनीषा आहे. ईश्वराची इच्छा असेल तर घडून येईलहि तसें. पण तेथपर्यंत तरी कै. वासुदेव वामनशास्त्री खरे यांच्याच जन्मभूमी कवितेच्या ओळी गुणगुणत रहावें असें वाटतें —

पोटासाठीं भटकत जरी दूर देशीं फिरेन
मी राजाच्या सदनिं अथवा घोर रानीं शिरेन ।
नेवो, नेतें जड तनुस या दूर देशास दैव
राहे चित्तीं प्रिय मम परी जन्मभूमी सदैव. ॥
या संसारीं निशिदिनिं जरी वाहतों क्लेशराशी
चिंताज्वाला निशिदिनिं जरी जाळती मन्मनासी ।
होतें जेव्हां स्मरणाचि तुझें जन्मभूमी क्षणैक
तेव्हां शांत स्थिर मन कसें होतसें जाय दुःख. ॥

## ( २ ) शिवनेरी किल्ला

किल्ल्याच्या तीन जाती आहेत. (१) भुईकोट, (२) जंजिरा, (३) डोंगरी. भुईकोट किल्ला सपाट जमिनीवर बांधलेला असतो. भोंवतालीं खंदक खणून त्यांत पाणी राखलेलें असतें. त्यामुळें शत्रूला किल्ल्याच्या तटापर्यंत येतां येत नाहीं. नगर, सोलापूर या ठिकाणीं भुईकोट किल्ले आहेत. समुद्रामध्यें खडकाळ जागा पाहून त्या ठिकाणीं किल्ला बांधतात त्यास जंजिरा किल्ला म्हणतात. समुद्राच्या

वेष्टनामुळें अशा किल्ल्यांचें रक्षण होतें. वसईचा किल्ला जंजिरा किल्ला होय. एकादा उंच व अवघड डोंगर पाहून त्यावर जो किल्ला बांधतात त्यास डोंगरी किल्ला म्हणतात. डोंगराच्या अवघडपणामुळेंच शत्रूला असा किल्ला काबीज करणें फार कठीण जातें. सिंहगड चढण्यास तानाजीस किती प्रयास पडले हें सर्वांस माहीत आहेच. पुरंदर, रायगड, लोहगड या जातीचे किल्ले आहेत. शिवनेरी हा एक तसाच डोंगरी किल्ला आहे.

जुन्नर म्हणून एक गांव आहे. त्याजवळ दोन मैलांवर शिवनेरी नांवाचा किल्ला आहे. अहमदनगरच्या निजामशहानें शहाजी राजांवर संतुष्ट होऊन जी त्यांना जहागिरी दिली त्यांपैकीं शिवनेरी किल्ला ही एक देणगी होती. "मला परक्याचे घरीं यावयाचें नाहीं. मला माझ्या घरीं शिवनेरी किल्ल्यावर पोहोंचतें करा. तिथें प्रसूत होण्यांत मला आनंद आहे." असा अभिमानाचा ठणठणीत जबाब जिजाबाईनें आपल्या वडिलांस दिला होता. तोच हा किल्ला.

किल्ल्याला एक मैलाचा चढ आहे. अर्ध्या वाटेवर शिवाई नांवाच्या देवीचें लहानसें टुमदार देऊळ आहे. गड चढत असतांना गर्भवती जिजामाता येथें विसाव्याकरितां थांबली होती. खणानारळाची ओटी भरून याच विश्वमातेजवळ राष्ट्रमाता मुलाचा नवस बोलली होती. नवस फळाला आला आणि याच शिवाई नांवावरून शिवाजी नांव जन्माला आलें.

पुढें आणखी अर्धा मैल चढ चढून गेल्यावर मुख्य दरवाजा लागतो. प्रवेशद्वार पडक्या स्थितींत आहे. तरी पण त्याच्या भव्यपणावरून पूर्वींच्या लोकांचा अंगलोट कसा असावा व त्यांच्या अंगांत किती जोम असावा ह्याचा अंदाज येतो. हत्तीच्या अंबारींत बसून जेव्हां सरकार स्वारी ह्या द्वारांतून आंत जात असेल तेव्हां ह्याची शोभा किती बहारीची असेल !

नंतर वळणावळणानें पुढें गेलें म्हणजे एक मोठा काळ्या पाषाणाचा खडक लागतो. या खडकांत कोरलेलीं दोन तळीं आहेत. कमरेला कमर चिकटलेलीं अशीं गोरीपान दोन सुंदर बालकें जशीं दिसतात, तशीं हीं जुळीं तळीं दिसतात. यांचीं नांवें गंगा-जमुना अशीं आहेत. पाणी स्वच्छ व गोड आहे. येथें प्रवासी आपली शिदोरी सोडतो व याच जिवंत पाण्याचें प्राशन करून आपला शिणवटा दूर करतो. इतक्या उंचीवर काय ही पाण्याची सोय ! पायथ्याच्या

जुन्नर गांवीं पाण्याचीं टंचाई आहे. पण शिवनेरीच्या ह्या उंचवट्यावर पाण्याची रेलचेल. किल्ला बांधतांना पूर्वीच्या लोकांची दृष्टि किती दूर होती हें दिसून येतें.

पुढें बालेकिल्ल्याचा ओसाड भाग आहे. दोन मैल परिघाचें हे लंबवर्तुळाकार मैदान आहे. जरी हें ओसाड व भकास आहे तरी पूर्वीच्या इमारतींच्या चौथऱ्यांचे अवशेष इतस्ततः पाहावयास मिळतात. शनवार वाड्यांत अशाच प्रकारचे चौथरे पाहावयास मिळतात. यावरून त्या ठिकाणीं कशा प्रकारच्या उंच, लांब व रुंद इमारती असाव्यात याची कल्पना येते. स्त्रियांचीं दालनें, पुरुषांचे दिवाणखाने, अधिकाऱ्यांच्या कचेऱ्या, सैनिकांच्या ओवऱ्या व चौक्या, माऱ्याचे बुरूज कोठें कोठें असतील याची अटकळ बांधतां येते. एके ठिकाणीं दरबारी शोभेचा एक विस्तृत हौद दृष्टीस पडतो. मध्यभागीं कारंज्याचीही व्यवस्था असावी असें दिसतें. दुसऱ्या एका लांब कोपऱ्याला कडा तुटलेली जागा आहे. कांठावर बांधीव फरशी आहे. या जागेवरून गुन्हेगारांस कडेलोटाची शिक्षा होत असे.

अशा पडक्या व रोडक्या स्थितींतही एक गोष्ट शाबूत राहिली आहे. ती म्हणजे शिवाजी महाराज जेथें जन्मले तें ठिकाण. जिजामाता जिथें प्रसूत झाली व शिवबाळ जेथें पाळण्यांत खेळलें, ती ही खोली. डागडुजी करून ती जशीच्या तशी ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. ही खोली पाहिल्याबरोबर किती बरें वाटतें ? पूर्वीचा सर्व इतिहास डोळ्यांपुढें उभा राहातो. मुसलमानी राजांनीं घातलेला तो धुडगूस, भोसले घराण्यांनीं कर्तबगारी गाजवून वर काढलेली मान— सर्व सर्व आठवतें. शिवजन्माची लोक आतुरतेनें वाट पहात होते. कित्येक दिवस निर्जल उपोषण घडलेल्या माणसास पाणी मिळालें म्हणजे जसा आनंद होतो तसा आनंद याच किल्ल्यावर लोकांनीं शिवजयंतीच्या दिवशीं उपभोगला होता.

या खोलीपुढें मी आपले गुढगे टेकले, मान वांकवली व नम्रतेनें मुजरा केला. धन्य तो काळ ! धन्य तें शिवबाळ ! आणि धन्य तो शिवनेरी किल्ला ! या ठिकाणीं कवि गोविंदाच्या लोकमान्यांवर रचिलेल्या गीताची उत्स्फूर्त आठवण होत आहे.

मुक्या मनानें किति उधळावे शब्दांचे बुडबुडे,
तुझे पवाडे गातिल पुढती तोफांचे चौघडे ॥

# ४. चरित्र

## (१) संत तुकाराम. (२) नरसिंह चिंतामण केळकर.

कसें लिहाल ?

चरित्रें हा कथनाचाच एक भाग आहे. पण त्यांतहि आयुष्यांतील जी **एक प्रकारची 'चढ' ती सुसंगत रीतीनें, आठवणी देत देत, प्रसंग सांगत सांगत, स्पष्ट करून दाखवावयाची असते.** 'माणूस जन्मतःच मोठा नसतो. तो आपला मोठेपणा क्रमाक्रमानें प्राप्त करून घेत असतो. त्यांत दैवाचा भाग किती, त्यांत कर्तबगारीचा भाग किती, त्यांत प्रसंगाचा भाग किती' या सर्वांचें थोडक्यांत कथन असतें. **कथनाच्या या प्रकारच्या भागाला या तऱ्हेच्या निबंधांत महत्त्व असतें.** इतर हकीकती गौण समजाव्यात.

**चरित्र सांगत असतांना 'देवपूजा' करीत असूं नये** किंवा इतर चरित्रनायकांना हास्यास्पद अथवा निंदास्पद ठरवूं नये. '**मोठ्या माणसांचा मोठेपणा त्या त्या कालप्रसंगांनीं निर्माण झालेला असतो.** एकमेकांच्या विरोधांत त्यामुळें तेजोविलोप दिसून येत असतो. सूर्य व चंद्र दोन्हीहि मोठे ग्रहगोल आहेत. ते जेव्हां एकमेकांच्या कक्षेत येतात तेव्हां त्यांचा कमीअधिक-पणा दिसत असतो. म्हणून त्यांना कमीअधिक लेखणें बरें नव्हे. हा विचार मनांत नित्य तेवत ठेवावा.

चरित्र सांगत असतांना सर्वच प्रसंग आपणाला माहिती असतात असें नव्हे किंवा सर्वच प्रसंग सारख्याच महत्त्वाचे असतील असें नव्हे किंवा **सर्वच प्रसंग सांगतां आले पाहिजेत असेंहि नव्हे.** चरित्रांत जे प्रसंग ठळक-पणानें घडून आले किंवा ज्यानें चरित्रांत बदल घडून आला किंवा ज्या प्रसंगा-बद्दल आपणांला अधिक चांगलें माहीत आहे, त्यांचेंच वर्णन करीत असावें. निबंधलेखनाची मर्यादा लहान आहे.

चरित्रांत आठवणींचा समावेश होईल. **मात्र त्या आठवणी 'खऱ्या' असाव्यात** आणि **चरित्रांतील प्रसंगाला उठाव देणाऱ्या असाव्यात.**

चरित्रांतील प्रसंग इतिहासक्रमाला धरूनच वर्णावेत.

**चरित्रांतील माहिती निश्चित स्वरूपाचीच असली पाहिजे.** ऐकीव माहिती, अनिश्चित माहिती, चरित्रकथनाला पोषक ठरत नाहीं.

चरित्रकथनाचा क्रम असा असावा — मातापित्यांची हकीकत; जन्मस्थळ, काळ इ०, कांहीं नैसर्गिक विधिघटना [ असल्यास अथवा माहिती असल्यास. ]

बाल्य, तारुण्य यांतील कांहीं प्रसंग. मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात.

प्रौढपणा—लग्न, पेशा, संतति. उत्कर्षाला सुरवात.

एकूण सामाजिक, धार्मिक, राजकीय, वाङ्मयीन पडसाद— त्यांची कामगिरी.

जीवनज्योत मालवली.

असें लिहिलेलें आणखी कोठें सांपडेल ?

श्री. रायकर आणि चित्रशाळा प्रेस यांनीं अशीं पुष्कळ लहान लहान चरित्रें लिहून प्रसिद्ध केलेलीं आहेत. त्याशिवाय न्या. मू. रानडे—फाटक; समर्थ चरित्र—फाटक; लो. टिळक—शिखरे; श्री. सावरकर—हुद्दार; महात्मा गांधी—सौ. अवंतिकाबाई गोखले; आगरकर—आळतेकर; शि. म. परांजपे—परांजपे; तीन थोर देशभक्त—ना. सी. फडके; आयर्लंडचे राष्ट्रवीर—केळकर, इ.

याप्रमाणें लिहून पहाल कां ?

सुभाषबाबूंचें चरित्र; वासुदेव बळवंत यांचें चरित्र, इ०

—

## ( १ ) तुकाराम-चरित्र

परमेश्वराचे भक्त कोणत्या जातींत नाहींत ? गोरा कुंभार, सावता माळी, चोखा महार, विठोबा खेचर, सज्जन कसाई—ही सर्व भक्तमंडळी सर्वांच्या परिचयाची आहेत. पण सर्व भक्तमंडळींत तुकाराम महाराजांना श्रेष्ठत्वाचा मान आहे. “ तुका झालासे कळस. ” असें त्यांचें वर्णन केलेलें आहे. जातीनें कुणबी व धंद्यानें वाणी. पण ‘ मुकुट सकळामणी अशी ’ त्यांची ख्याति आहे.

जयाची वदे पूर्ण वेदान्त वाणी
कसें हो म्हणावें तयालागिं वाणी ?

परब्रह्मरूपी अजा हा तुका वा
तयाचें तुकीं कोण दूजा तुका वा ॥

— **वामन पंडित.**

देहू म्हणून पुण्याजवळ एक गांव आहे. तेथें विश्वंभर म्हणून परम पांडुरंग-भक्त होते. त्यांच्या निस्सीम भक्तीमुळें त्यांना पांडुरंगाची स्वयंभू मूर्ती मिळाली होती अशी आख्यायिका सांगतात. तिची त्यांनीं देहू या गांवीं स्थापना केली. यांचे खापरपणतू बोल्होबा हे तुकाराम महाराजांचे वडील होत. आईचें नांव कनकाई. दोघेही पतिपत्नी परमेश्वरनिष्ठ. बोल्होबांनीं पंढरीची वारी चोवीस वर्षें सारखी केली. त्यांना तीन मुलगे: सावजी, तुकाराम आणि कान्होबा. तुकारामांचा जन्म शके १५३० या वर्षीं झाला.

विटीदांडू, फुगड्या, हुंबरी, हमामा, कांडण इत्यादि मुलांमुलींचे हरएक खेळ त्यांना अवगत होते. बोल्होबा सकाळ-संध्याकाळ विठोबाचें भजन करीत. त्या वेळीं तुकाराम मागें ध्रुपद धरीत. त्यामुळें साधुसंतांचे अनेक अभंग मुखोद्गत झाले होते. परंपरागत वाणीपणाचा धंदा ते उत्तम चालवीत असत. सचोटी, मधुर वाणी व नम्र वृत्ति यांच्या योगानें ते सर्वांना प्रिय झाले होते. वडिलांनीं तिघांही मुलांचीं लग्नें केलीं. पण तुकारामाच्या बायकोस दम्याचा विकार होता. म्हणून त्यांचें दुसरें लग्न करून दिलें होतें. तुकारामांना चार मुलगे व तीन मुली, अशीं सात अपत्यें झालीं. पूर्वार्धात सांसारिक दृष्ट्या तुकारामांचा चांगलाच जम बसला होता.

वयाच्या सतराव्या वर्षापासून त्यांचा काळ बदलला. मातापितरें निवर्तलीं, वडील बंधू विरक्त होऊन तीर्थाटनास निघून गेले. याच सुमारास दुष्काळ पडला. गुरेंढोरें मेलीं. पहिली बायको अन्न अन्न करून प्राणास मुकली. थोरला मुलगा संतू वारला. चारी बाजूंनीं दुःखाचा कहर झाला आणि यांत भर म्हणजे दुसरी बायको अतिशय कर्कशा निघाली. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणजे तुकाराम विरक्त झाले व ईश्वरभजनीं लागले. पण पुढील आयुष्यांत त्यांनीं एकदांही या बिकट व वाईट परिस्थितीला दोष दिल्याचें आढळत नाहीं. उलट —

बरें झालें देवा बाईल कर्कशा ।
बरी ही दुर्दशा जनामध्यें ॥

याप्रमाणें परमेश्वराच्या भजनामध्येंच रममाण होण्यास उद्युक्त करणाऱ्या या दुरवस्थेची त्यांनीं स्तुतीच केली आहे.

तुकाराम महाराज उत्तम कीर्तनकार होते. शिवाजी महाराज तर एकदां सर्व राज्य सोडून त्यांच्या भजनीं लागले. रामेश्वरभट्टासारखे प्रथमश्रेणीचे वेदान्त-विशारद तुकारामाचे शिष्य बनले. त्यांनीं आरतींत तुकाराम महाराजांची थोरवी वर्णन केली आहे —

तुकिता तुळणेसी । ब्रह्म तुकाचि झालें ।
म्हणोनि रामेश्वरें । चरणीं मस्तक ठेविलें ॥

तुकाराम महाराजांचे एकूण १४ टाळकरी पट्टशिष्य आहेत. त्यांत त्यांचे कनिष्ठ बंधू कान्होबा हेही आहेत.

तुकारामांचे वाङ्मय अभंगरूपानें आहे. ' अभंगवाणी प्रसिद्ध तुक्याची ॥ ' असा त्यांचा लौकिक आहे. ' नामदेवें केलें स्वप्नामाजि जागें ', याप्रमाणें त्यांना नामदेवांनीं दृष्टान्त देऊन आणि अभंग लिहिण्यास प्रवृत्त केलें अशी हकीकत त्यांनींच नमूद केलेली आहे. अभंग किती साधे व सुबोध असतात ! अन्वयार्थाची जरूरीच नाहीं. जणूं कांहीं सरळ वाहाणारा गंगेचा प्रवाह.

हेंचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ॥

अर्थासाठीं त्यांत शब्द मागें पुढें कांहीं ओढावे लागत नाहींत. नुसता अभंग म्हणावा आणि अर्थ मनमुराद चाखावा. वाङ्मयांतील दुसरी मजा म्हणजे सहज अलंकाराचा सोपेपणा. यमक्या वामनाप्रमाणें त्यांत श्रमाची खटपट दिसत नाहीं. दृष्टान्त पाहिजे असतील तर —

कां रे नाठवीसी कृपाळु देवासी । पोषितो जगासी एकलाचि ।
कोणें केली बाळा दुधाची उत्पत्ती । वाढवी श्रीपति, सवें दोन्ही ॥ इ.

हा अभंग म्हणा. पोटांत गुदगुल्या होतील आणि डोळ्यांतून आनंदाच्या टीपा न कळतांहि पडतील.

तुकाराम महाराजांचा निर्याणकाल आला त्या वेळीं त्यांनीं आपल्या कीर्तनांत ' आम्ही जातों आमुच्या गांवा । आमुचा रामराम घ्यावा ॥ ' असा अभंग घेतला होता. आपुलें मरण पाहिलें मी डोळां । हें शब्दशः त्यांनीं पटवून दाखविलें.

विमानांत बसून ते स्वर्गलोकीं गेले असें म्हणतात. हें खरें, खोटें कांहीं असो. त्यांना सुखाचें मरण आलें ह्यांत 'संशय नाहीं. शेंवट चांगला तें सर्व चांगलें.

---

## ( २ ) नरसिंह चिंतामण केळकर

मला असें वाटे कीं, मोठीं माणसें नेहमीं मोठीं असतात. त्यांचा जन्म मोठा असतो, त्यांचे आईबाप मोठे असतात, त्यांचें घराणें मोठें असतें, त्यांचें शिक्षण मोठें असतें, त्यांचें कर्म मोठें असतें, त्यांचे इष्टमित्र मोठे असतात, त्यांचें सर्वच कांहीं मोठें व उच्च असतें. त्यांच्या मानानें आपण फार दरिद्री व गरीब. ते सुदैवी व थोर आणि आम्ही अभागी व लहान. त्यांच्या मोठेपणाकडे पाहून भीति वाटते, लाज वाटते. 'थोरांपासुनि दूर दूर फिरतो लाजून वस्त्राविणें' — अशी माझी तरी अवस्था होते.

पण हा भ्रम एकाद्या जरी मोठ्या माणसाचें चरित्र त्याच्या जयंतीपासून मयंतीपर्यंत पाहिलें तर सहज दूर होईल. माणूस हा प्रथम बीजासारखा लहान असून पुढें तो वृक्षाप्रमाणें विकसत विकसत जातो. जयंतीच्या वेळीं तो लहान असतो व मयंतीच्या वेळीं तो मोठा झालेला असतो. म्हणूनच माणसांची मयंती साजरी करतात.

मिरज संस्थानांत मोडलिंब म्हणून एक गांव आहे. येथें १८७२ सालीं या साहित्यसम्राट् नरसिंह चिंतामण केळकर यांचा जन्म झाला. घरची अत्यंत गरिबी. हें गरिबाघरचें मूल पुढें सम्राट् होणार, असें स्वप्नांतही कोणास वाटलें नसेल. ह्यांना कणावाराखेरीज पोटभर भातही खावयास मिळत नव्हता. पण पुढें ते अनेकांचे अन्नदाते बनले. आज्ञाधारकपणा व सेवा त्यांना भारी आवडे. मिरजेच्या सरकारी बागेंतून वडिलांना पूजेसाठीं फुलांचा पुडा ते नेहमीं आणीत. हे गुण जसे आईबापांना आनंद देण्यास कारणीभूत झाले तसे पुढें केसरीसारखी मोठी संस्था ऊर्जितावस्थेस आणण्यासहि उपयोगी पडले. त्यांचें कॉलेजचें शिक्षण पुणें व मुंबई येथें झालें. २३ व्या वर्षी ते वकीलीचीं परीक्षा उत्तीर्ण झाले. सातारा हें गांव वकिली सुरू करण्यासाठीं त्यांनीं पसंत केलें व तेथें ते वकिली करूं लागले.

ह्या वेळीं कोहिनूर हिऱ्याची आठवण होते. कोहिनूर हिरा हा एका धनगराच्या

शेळीच्या गळ्यांत दगड म्हणून बांधला होता. पण तो तेथें किती दिवस राहिला? अनेक उच्च देशांत वावरत वावरत तो एका सम्राटाच्या डोक्यावर जाऊन बसला. तसेंच केळकरांचें झालें. १८९५ सालीं लोकमान्य टिळक सातार्‍यास आले व त्यानीं केळकरांचे गुण हेरले. रत्नपारख्याला रत्नांची पारख. त्यांनीं त्यांना अलगद् उचलून पुण्याला केसरी-संस्थेंत आणलें. दोन सिंहांचा केसरी सुरू झाला.

केळकरांनीं राजकारणांतही भाग घेतला होता. गोलमेज परिषदेसाठीं ते इंग्लंडास गेले होते. १९०८ सालीं लोकमान्य टिळकांना शिक्षा झाली. शिक्षा देणार्‍या न्यायाधीशावर त्यांनीं कडक टीका केली. त्यासाठीं त्यांना तुरुंगवास सोसावा लागला व १२०० रु. दंड भरावा लागला. महात्माजींशीं त्यांचें पटलें नाहीं.

पण केळकर साहित्याकरितां प्रसिद्ध आहेत. त्यांनीं वाङ्मयाची सेवा केली ती अमोल आहे. लघुकथा, नाटकें, कादंबर्‍या, इतिहास, विनोद, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र इत्यादि अनेक प्रकारचें वाङ्मय त्यांच्या लेखणींतून उतरलें आहे. त्यांच्या वाङ्मयाची निर्मिती एवढी प्रचंड आहे कीं, त्यामुळेंच त्यांना साहित्य-सम्राट् म्हटलें तरी शोभेल.

कट्टर सुधारक त्यांना सनातनी समजत; तर सोंवळे सनातनी त्यांना सुधारक समजत. ते पुनर्विवाह, स्त्रीशिक्षण यांस अनुकूल होते, तरी सुधारकांचीं आत्यंतिक एकांगी मतें त्यांना पसंत नव्हतीं. ते नेहमीं अनुयायांच्या पुढें चार पावलें टाकून चालत. त्यांना सुवर्णमध्य फार आवडे. कोणतीही गोष्ट विकोपाला जाऊं नये, दोन्ही बाजूंमध्यें समझोता व्हावा, यासाठीं त्यांची नेहमीं धडपड चालत असे.

केळकरांना पाउणशें वर्षांचें आयुष्य लाभलें. सर्वांत मोठें भय म्हणजे मृत्यूचें. जो मरणाला भीत नाहीं तो निर्भय. केळकर ह्या कोटींतील होते. संत तुकारामांप्रमाणें मरणाचा सोहळा निर्माण करणारी ही व्यक्ति होती.

आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां ।
तो हा सोहळा अनुपम ॥

पंचमहाभूतांना त्यांचा आहेर परत करीत करीत हा महापुरुष १४ ऑक्टोबर १९४७ रोजीं दिवंगत झाला. शेवटीं असें म्हणावेंसें वाटतें—

'तव स्मरण संतत स्फुरणदायि आम्हां घडो.'

# ५. कल्पनाप्रधान निबंध

## (१) मला एक लाख रुपये मिळाले तर– (२) मी मंत्री झालों तर–

कसें लिहाल ?

हा सर्व भाग कल्पनेचाच असल्यानें त्या कल्पना व्यक्तिनिष्ठ असतील. कल्पनांचा निरनिराळेपणा असणें हेंच स्वाभाविक. शिवाय कल्पना असंभाव्यहि असूं शकतील. लेखकाच्या वाचलेल्या, अनुभवलेल्या ज्ञानांतून या कल्पना प्रस्फुरतील. **आणि त्या तशाच असाव्यात.** रामदासांनीं सांगितलें आहे.

'करंटा पडोनि उताणा करी नानापरी कल्पना'

मात्र त्या कल्पना एकमेकींशीं सुसंगत असाव्यात. रम्यत्व कल्पनांतहि आहे, त्यांच्या बांधणींतहि आहे. हें रम्यत्व अनुभवणाऱ्या वाचकांवरहि अवलंबून आहे. सर्वच वाचकांना लिहिल्या गेलेल्या व मांडल्या गेलेल्या कल्पना पसंत पडतील असें नाहीं. **या जातीचा निबंध, म्हणूनच सर्व परीक्षकांना संतुष्ट करणारा असेलच, असें नाहीं.** मति भिन्न भिन्न असते.

म्हणून लिहिण्याची धाटणी तरी नीट राखलेली पाहिजे. विषयांत एकदम प्रवेश करावा–**जणुं कांहीं विमान एकदम सुरकांडी मारून जमिनीवर हांपटत आहे.** आणि एकदां त्या विषयांत प्रवेश झाला कीं मग सावकाशपणें **आपलीं मतें, आपल्या कल्पना, आपले विचार, आपल्या भाषेंत मांडीत जावें.** लोकांना आवडेल कीं नाहीं, या विचारांना या प्रकारच्या लेखनांत थाराच देऊं नये. **सर्व कांहीं आपलेंच असावें.**

या तऱ्हेच्या लिखाणांत विरुद्ध बाजू दिलेली असेल, किंवा पुढें आपण करणार असल्याच्या कल्पना दिलेल्या असतील, किंवा सद्यःकालीन घडामोडींवर नर्मप्राय टीकाहि असूं शकेल. चांगल्या असलेल्या भागाचाहि उपहास केलेला असेल. अमकीच दिशा असेल, असें सांगतां येणार नाहीं.

म्हणून भाषा योजितांना शक्य तितकी सोपी असावी. वाक्यें लहान लहानच

असावींत. मोठीं योजिलींच तरी त्या वाक्यांत बोजड शब्द तरी असूं नयेत. **कल्पनांच्या वावड्या उडवीत असतांना जड जड शब्द त्यांना अडथळा करतील.**

**दर कल्पनेला नवीन परिच्छेद** पाडणें अधिक चांगलें होईल. रॉकेटच्या योजनेमुळें नाहीं कां बाण मंगळापर्यंत पोंचत, तसें ! त्या कल्पना विचित्र असल्या तर वेग अधिकच प्राप्त होईल.

**सजावटीसाठीं सदृश सदृश गोष्टीही एकत्रित कराव्यात.** त्यामुळें विषयांतील तादात्म्य वाढतच जातें.

हें असलें लिहिलेलें आणखी कोठें मिळेल ?

अच्युतराव कोल्हटकरांची चार आणे माला ग्रंथावलि; त्यांच्या स्मारक ग्रंथांतील– माधवाश्रमांत शिवाजी; पुराणपुरुषांच्या अडचणी– द. वि. गुते; शि. म. परांजपे यांचा भासावरील निबंध, इ.

हें याप्रमाणें लिहून पहाल कां ?

१ मी संपादक झालों तर–? २ मी शाळेचा मुख्याध्यापक झालों तर–; ३ गुंडांच्या तडाक्यांत सांपडलों असतांना– ४ शब्दकोडीं; ५ माझी दिवाळीची सुटी कशी घालवीन; ६ माझा आदर्श समाजसेवक; ७ रेडियोनें समाजसुधारणा कशी करतां येईल ? ८ तुम्हांला १००० रुपये दिले तर एका दिवसांत कसे खर्च कराल ? ९ रेशनची दीर्घ रांग पाहून– १० मी पुढें कोण होणार आहे ?

## ( १ ) मला एक लाख रुपये मिळाले तर––

एक बेलीफ होता. लॉटरीचें तिकीट घेण्याचा त्याला नाद होता. एकदां त्याचा नंबर आला व एक लाख रुपये मिळाले. इतका पैसा कधीं पाहिला नव्हता. आतां मालकीचा म्हणून हातांत आला. त्याला अतोनात आनंद झाला. त्या आनंदांत त्याला वेड लागलें व त्यांतच तो मेला. कल्पनेपेक्षां अधिक प्राप्ति मिळणें केव्हांहि चांगलें नाहीं.

दोन माणसांना मुंबईच्या स्फोटांत एकदां सोन्याची वीट मिळाली. दोघांनीं निम्मी निम्मी वाटून घ्यावयाची ठरवली. एकजण वीट फोडण्याचीं हत्यारें आणावयास गेला. त्याच्या मनांत काळेंबेरें आलें. त्यानें वाटेंत थोडी मिठाई घेतली व त्यांत वीष मिसळून ठेवलें. वीट संभाळणाऱ्यानेंही वाईट योजलें. त्यानें दुसऱ्याच्या डोक्यांत धोंडा घालण्याचें ठरविलें. दोघांचे बेत यशस्वी झाले. एक वीष खाऊन मेला व दुसरा डोकें फुटून मेला. जितकी प्राप्ति होते तितक्यांत माणसाला समाधान नाहीं.

धर्मराजाच्या काळांत एकदां एका घरवाल्यास १०,००० होनांचा हंडा पाया खणीत असतांना सांपडला. त्यानें तो धर्मराजाकडे पोहोंचता केला व म्हटलें, "सरकार, मी घर विकत घेतलें. ही वस्तू जमिनींत सांपडली आहे. ज्याची त्यास देऊन टाकावी." धर्मराजानें मूळ मालकास बोलावलें व हंडा घेऊन जाण्यास सांगितलें. तो म्हणाला, "सरकार, मी घर विकत दिलें त्या वेळीं सर्व कांहीं दिलें. हें माझें नाहीं." दोघेही हंडा घेण्यास तयार झाले नाहींत. अशीं माणसें चालू काळांत स्वप्नांतही दृष्टीस पडणार नाहींत आणि जर आढळतील तर तीं शहाणीं ठरणार नाहींत. शहाणपणा म्हणजे काळाला अनुसरून वागणें होय.

माझ्या एका मित्रानें कोडें सोडविलें व दैवयोगानें त्याला १६,००० रु. चें बक्षीस मिळालें. त्यानें ताबडतोब नोकरी सोडली व कापडाचें दुकान घातलें. काळाबाजारवाल्यानें लाखाचे दोन लाख केले. पण हा आमचा मित्र खालावतच चालला. दोन वर्षांनीं त्यानें दुकान बंद केलें व तो एका हातमागाच्या कारखान्यांत आतां काम करीत आहे. व्यापारांत त्याला जास्त पैसा करतां आला नाहीं.

एकाद्या अहिल्याबाईला लाख रुपये मिळाले तर ती गंगेला एकादा घाट बांधील किंवा गरिबांकरितां एकादें अन्नछत्र चालवील. एकाद्या दारुड्यास इतके पैसे मिळाले तर तो मदिरामंडळ स्थापील व दोन दिवसांत पैशाचा चक्काचूर करील

मला लाख रुपये मिळाले तर ...? माझ्यापुढें एकामागून एक अशीं किती तरी चित्रें येतात व वाटतें त्यानें मला सुख मिळेल का? मला लाख मिळाले तर माझ्या आनंदांत कोण कोण भागीदार होतील? माझा मत्सर कोणाकोणाला वाटेल? पैशाचा विनियोग करण्याचे कोणते विचार मला सुचतील?

अनुक्रम ७५७०४ क्र. लि. दि. २८।१२।५

खरोखरच मला लाख रुपये मिळतील तर प्रथम मी श्रीसत्यनारायणाचें निमित्त करून इष्टमित्र, शेजारीपाजारी, भाऊबंद, चाकरनौकर, यांना प्रसादाला बोलावीन व भरपूर खावयाला घालीन. वास्तू झाल्याशिवाय गृहशांति नाहीं.

ज्या आईबापांनीं हाडाचीं काडें करून मला पोसलें, वाढविलें, शिक्षण दिलें व मोठें केलें त्यांच्यापुढें दहा हजार रुपयांचा भाग ठेवून सांगेन, "आई-बाबा, माझ्याकरतां तुम्ही फार कष्टलांत. पैशानें त्यांची फेड यावज्जीव होणार नाहीं. तरी पण ही अल्पशी भेट स्वीकारावी व यांतून तुम्हांला आवडेल तें करावें." अशा वेळीं आईबापांची आठवण न होणें म्हणजे निव्वळ कृतघ्नपणाच आहे.

आईबापांनीं मला शिक्षण देऊन मोठें केलें. पण स्वतः ते अकिंचन झाले. धाकट्या भावास शिक्षण देऊन त्यास सुविद्य करणें आतां माझें कर्तव्य आहे. विद्येचें संतान पुढें चालू ठेवलें पाहिजे. त्याच्याकरितां २०,००० रु. ची रक्कम बँकेंत ठेवीन व हप्त्या-हप्त्यानें त्यास ते वेळेवर मिळण्याची व्यवस्था करीन. रामानें भरतासाठीं राज्य सोडलें. मी एवढें करण्याची इच्छाहि करूं नये ?

मी तरुण आहे. आंगांत हुंबाडी आहे. जबाबदारींत आडकलों नाहीं. अजून माझ्या जीवनाचें मडकें भाजून निघालेलें नाहीं. मी जें जें शिकेन, पाहीन, अनुभवीन त्याचा माझ्या पुढील आयुष्यावर परिणाम होणार आहे. योग्य परिणामाची जरुरी आहे. परिस्थिती अनुकूल आहे. मग हयगय कां ?

मी उरलेल्या पैशांतून दुनिया हिंडून येईन. येथें १५० वर्षे राज्य करणाऱ्या ब्रिटिश लोकांचें इंग्लंड पाहीन. रसायन शास्त्रांत अग्रगण्य असणारा जर्मनी नजरेखालीं घालीन. शेतकऱ्यांचें व कामकऱ्यांचें सुखाचें राज्य रशियांत अनुभवीन. चीन-जपान या शेजार-राष्ट्रांत फिरून येईन. जेथें हल्लीं सोन्याचा धूर निघतो, सर्व जगाला ज्यानें पैशानें बांधलें आहे, हैराण राष्ट्रें ज्याच्या तोंडाकडे पाहातात व पोटभर गोळ्याकरतां मदतीची याचना करतात, फोर्डसारखे अब्जाधीश कुबेर जिथें आहेत, ज्या ठिकाणीं लक्ष्मी पाणी भरते, सरस्वती पंचांग सांगते, धन्वंतरी पायरीवर बसून आहेत, मयासूर हात जोडून उभा आहे, तो अमेरिका देश मी धुंडाळून येईन.

पैसा पुन्हां मिळेल. पण देश पाहावयाची संधि कदाचित् पुन्हां मिळणार

नाहीं. दुनियेच्या अनुभवाखेरीज दुसरें अधिक श्रेष्ठ काय आहे ? पृथ्वी फार मोठी आहे. विविध आहे. ती डोळ्यानें कांहीं पाहिली तर खरी मौज. बाकीचा सर्व सिनेमा.

---

## ( २ ) मी मंत्री झालों तर

" तुझ्या हातांतला लाडू देत असशील तर तुला सोडतें, " असें बहिणीनें म्हणावें व " होय " म्हणून मी सुटावें व पळून जावें. " रोज एक तास अभ्यास कराल तर मुलांनो सहज पास व्हाल. कोण कोण तयार आहे पाहूं ? " गुरुजींनीं सवाल टाकावा. माझा हात सर्वांअगोदर वर. पण नियमित रोज ५ मिनिटें अभ्यास केला असेल तर शपथ. लहानपणापासूनच दुसऱ्याला आवडेल तें बोलावयाचें ही संवय लागलेली. वाचेचा आणि कृतीचा कांहीं संबंध असतो, असें स्वप्नांतही वाटत नव्हतें.

खरोखर असा संबंध कांहीं आहे कां ? महमद घोरीनें राज्य कमावलें पृथ्वीराजानें गमावलें. इतिहास आहे. वचन पाळून रामानें काय मिळवलें ? वनवासच ना ? व्यापाराच्या गादीवर बसावयाचें आणि बोलण्यांत सचोटी ठेवावयाची ? नालायक ठरेल तो. पावलों पावलीं वचनभंग केला तरच माणसाला सुखानें जगतां येईल. गोड बोलावयाचें विश्वास बसण्याकरितां. आचरणाकरितां नव्हे.

मी मंत्री झालों तर त्या प्रश्नाचें उत्तर आतां दुसरें कां द्यावयाला पाहिजे ? लोकांना आवडतील अशींच प्रसिद्धीपत्रकें काढीन. प्रतिज्ञा करीन आणि निवडून येईन. निवडून आल्यानंतर काय करायचें तें पुढें पाहून घेईन. लग्नामध्यें व निवडणुकीमध्यें खरें बोलून कोठें कार्यसिद्धि होतें ? उलट खोटें बोलून लग्न जुळवावें असें शास्त्रच आहे.

पण खरोखरच मी मंत्री झालों तर काय करीन ? या प्रश्नाचें उत्तर राहिलें. काय करणार नाहीं तें सांगितलें. निवडणुकीचे वेळीं जसें बोललों तसें करणार नाहीं हें नकारार्थी उत्तर झालें. पण खरोखर काय करणार याचा उलगडा झाला पाहिजे.

म्युनिसिपालिटीचा साधा मेंबर निवडून येईन तर घरापुढचा रस्ता सीमेंटचा करीन व समोर म्युनिसिपालिटीचा दिवा उभा करीन. मंत्री झालों तर...... असल्या किरकोळ गोष्टींत गुरफुटून बसेन ? छे ! किती तरी गोष्टी साधेन ! सर्व दुनियेंतील सुखें पायाशीं आणीन.

दारूबंदी हें दप्तर माझेकडे घेईन, रात्रीं बेरात्रीं हिंडून नशेंतले लोक त्यांच्या भट्टीसुद्धां हुडकून काढीन. पण माझ्या भट्टीचा मात्र पत्ता लागूं देणार नाहीं.

मोटार, फर्निचर, बैठक, चाकर, नौकर सरकारच्या खर्चानें घरीं वापरीन, राबवीन. मुलांना परदेशांत पाठवून सुविद्य करून आणीन. नात्यागोत्यांना व भाऊबंदांना फायद्याच्या सवलती जरूर देईन. स्वार्थ कां कोणी सोडायचा असतो ! आणि अधिकार प्राप्त झाल्यावर यांना विसरून कसें चालेल ?

घरीं मलमलीचे व तलम कापड वापरीन. मग ते देशी असो कीं विदेशी असो. पण सरकारदरबारचा पोषाख शुद्ध जाड्याभरड्या खादीचा राहील. क्वचित् आंत मलमल वापरून वर खादी चढवीन. हातानें सूत काढीन व हातानें कपडा धुवावा असें कटाक्षानें बोलेन पण माझ्या अंगावर परीटघडीच असेल. पोषाखाची ही दुहेरी व्यवस्था केल्याशिवाय राजकारणाचे खेळ कसे खेळतां येतील ?

अन्नधान्याची ओढाताण होत आहे हें आपण पाहतोंच. त्यांत जरूर ती सुधारणा घडवीन व भरपूर चांगल्या प्रतीचें धान्य मिळण्याची अवश्य खटपट करीन. पण हें सर्व माझ्या घरापुरतेंच बरें कां ? पुरेशी साखर, खाळ गहू व सुगंधी आंबेमोहोर कसा मिळणार नाहीं तें मग पाहातों. Charity begins at home ! असेंच कांहींसें नाहीं कां इंग्रजी वचन ?

रामेश्वरापासून काश्मीरपर्यंत सर्व हिंदुस्थान सरकारी खर्चानें पाहून घेईन.

एवढेंच काय, संधि साधून परराष्ट्रांतील कांहीं परिषदांस जाऊन परदेशही पाळीपाळीनें धुंडून येईन. तिसऱ्या वर्गाचें तिकीट काढून पहिल्या वर्गाचा भत्ता व चाकर न घेतांच बरोबर चाकर आणल्याचा खर्च काढून घेणें ही साधी नित्याची सामान्य माणसांची गोष्ट आहे. पण कायदेशीर लबाडीशिवाय जगांत पैसा मिळत नसतो हा मोठ्यांचा नेहमींचा अनुभव आहे.

असें वागलें तर पुन्हां कसें निवडून येतां येईल, अशी शंका येण्याचा संभव

आहे. त्याची भीति नको. निवडणूक हा एक स्टंट आहे. महिनाभर आधीं कृत्रिम अडचण निर्माण करावयाची व त्यांतून लोकांना मुक्त करून दाखवावयाचें. दिवाळीच्या अगोदर डालडा व साखर नाहींशी करून टाकावयाची व दिवाळीच्या आठवड्यांत रेशन दुकानांत त्याचा भरपूर सांठा द्यावयाचा. गिरणीमालकांना दिवाळीचे अगोदर मजुरांस बोनस देऊन टाका म्हणून सांगावयाचें, महागाई भत्ताही याच वेळेस कांहीं टक्के वाढवून इतर नौकरांना खूष करावयाचें. याशिवाय आयत्येवेळीं मोटार पाठवून मतदारांना मतदानस्थानीं आणावयाचें, प्रसिद्धी-करणाचें नवें स्टंट तर अगोदरच जाहीर करून टाकावयाचें, मग कसा मी निवडून येणार नाहीं ? दुनिया झुकती है. झुकानेवाला चाहीये.

मित्रहो, मी खरें बोलतों याबद्दल रागावूं नका. अंतःकरण कोणी उलगडून दाखवीत नाहीं. मारुतीसारखी छाती फाडून मी आंतलें चित्र दाखविलें आहे. मंत्र्याच्या हातांतल्या जाहीरनामामालेकडे पाहून काय मिळणार ? तिच्या एकाही मण्यांत त्यांचा आत्माराम दिसणार नाहीं. तुम्हाला तो आत्माराम दिसावा म्हणून मी माझी छाती-फोड केली आहे. पाहून घ्या हें दर्शन. जग हें असें आहे.

---

# ६. कथन

## (१) एक अपघात (२) मी पाहिलेला हुतुतूचा एक सामना.

कसं लिहाल ?

कथन याचा अर्थच असा कीं '**एकजण दुसऱ्या कोणाला तरी सांगत आहे.**' तशीच स्थिति आपल्या रचनेवरून दिसून यावयास पाहिजे.

आपण पत्र लिहितों, तीं कथन स्वरूपाचींच असतात. आपण कोणाला गोष्ट सांगतों किंवा एकाद्या वस्तूचें वर्णन करतों किंवा एकाद्या माणसाचें चरित्र सांगतों किंवा व्याख्यान देतों,—तें सर्व कथनात्मक असतें. पण थोडासा विशेष लक्ष्यांत ठेवावयास पाहिजे.

प्रत्यक्ष पाहिलेली हकीकित वर्णन करूं लागलों, तर त्या वर्णनाला—त्या प्रत्यक्ष दृश्याला—महत्त्व असल्यानें, तो विभाग वर्णनात्मकच होईल. दृश्य स्वतांच सांगत आहे, असें कल्पिलें, तर तें आत्मवृत्त होईल. **लक्ष्यांत ठेवलें पाहिजे कीं आपण लिहिणार आहोंत. तें कोणत्या भूमिकेंत.**

कथनामध्यें घडून गेलेली हकीकत सांगावयाची असते. इतिहास, पुराण, अशी भूमिका असेल. सांगतांना दृश्याचें विविध दर्शन होणें स्वाभाविक आहे, पण तो भाग किंचित् गौणच राहील. स्वतांचीच हकीकत सांगितली जात असतां आत्मचरित्रपर दिसूं लागेल. पण आत्मचरित्रांत नुसतें कथानक नसतें. आपल्याच पूर्वकालीन स्थितींमधून सद्यःकालीन स्थितींत जें भलेंबुरें परिवर्तन झालेलें असतें, त्यांचें चित्रण असतें. **कथनामध्यें एकाद्याच हकीकतीचें दृश्याचें, प्रसंगाचें, दुसऱ्यास निवेदन असतें.** हा फरक लक्ष्यांत ठेवावयासच पाहिजे.

तेव्हां ती भूमिका अगोदर स्पष्ट करावी : म्हणजेच सांगण्यासाठीं प्रसंग निर्माण करावा; सांगण्यासारखीं पात्रें निर्माण करावींत.

प्रत्यक्ष सांगत असतांना चित्र दृश्य व्हावें, म्हणून वर्णनांत भावनेचा भाग अतिशयोक्तहि होईल. प्रसंगाप्रमाणें भाषा आपलें स्वरूप बदलत राहील. तरी पण लहान लहान वाक्यें, आणि उद्गारचिन्हें यांचीच अतिशयोक्ति असावी.

कथन क्रमवार असावें. हेंहि नीट लक्ष्यांत ठेवावें.

शेवट साधतांना भावनेचा उद्रेक स्पष्ट पाहिजेच.

## हें असलें लिहिलेलें आणखी कोठें सांपडेल ?

पांडवप्रताप, सिंहासनबत्तिशी । पंचतंत्र इ. प्राचीन ग्रंथ. पण लक्ष्यांत कोण घेतो ? फोल आशा, उल्का, बंधनाच्या पलीकडे इ.

## हें लिहून पहाल कां ?

१ माझ्या गुरुजींची आठवण; २ एक चिरस्मरणीय प्रसंग; ३ मी पाहिलेला क्रिकेटचा खेळ; ४ माझें आवडतें नाटक; ५ मला आवडलेला एक चित्रपट; ६ माझा आवडता पुढारी; ७ माझा आवडता ग्रंथकार; ८ माझी भार्या; ९ माझी कन्या; १० माझा गांव.

## ( १ ) एक अपघात

‘ ही आपली मोटार बरें कां ! तुला आणि बाळला काळजीपूर्वक व सावधगिरीनें घेऊन ये, म्हणून मला बाबांनीं बजावून सांगितलें आहे. ताई, मी आतां लहान कां ग आहे इतका असें सांगावयाला ? ’ असें मी म्हणत आहे, त्याच क्षणीं ‘ आईऽऽग, मेलें, ’ असें म्हणून ताई किंचाळलीच. तिनें मला कवटाळिलें व ती मला म्हणाली, ‘ बाळ मधू ! आहेस ना तूं येथें ! बरें झालें. नाहीं तर आईकडे जायला मला तोंड नाहीं रे ! “ मला वाटलें ” ‘ तिला वेडाची लहर आली. मी घाबरूनच गेलों.

थोडया वेळानें आम्हीं मोटारींत बसलों व मोटार सावकाश सुरूं झाली. मी ताईला विचारलें, तेव्हां ताई मला सांगूं लागली. ती म्हणाली —

“दहा वर्षांपूर्वीची गोष्ट—

माझें नुकतेंच लग्न झालें होतें व दिवाळीनिमित्त मी याच दिवसांत माहेरला आलें होतें. याच गाडीनें स्टेशनवर मी आलें होतें. बाबा मोटार घेऊन आले होते. तूं त्यांच्याबरोबर होतास. तूं ५।६ वर्षांचा लहान होतास. निळी चड्डी घातली होतीस. बगळ्याच्या पंखासारखा पांढरा शुभ्र शर्ट घातला होतास. गळ्यास स्काऊटचा स्कार्फ झकास बांधला होतास. छातीला एक कापडाचें फूल लटकावलें होतें. केसांचा सुंदर भांग पाडला होता. पायांत मोजे व बूट होते. मी गाडीवर उतरतांक्षणींच हुश्शार स्थितींत उभें राहून तीन बोटांचा सलाम करून तूं माझें स्वागत केलेंस. बाबांनीं मुद्दामच तुला ह्या पोषाखांत माझ्या स्वागतासाठीं आणलें होतें. लग्नापूर्वीं मी शाळेंत शिकत होतें. स्काऊटमध्यें भाग घेत असें. पुष्कळ वेळां मी स्काऊटच्या पोषाखांत घरीं फिरकत असें. ह्या पोषाखांत मी बाबांना फार आवडे.

मी चटकन् तुला उचललें व प्रथम तुझा पापा घेतला. आपण तिघे बाहेर आलों व याच मोटारींत बसलों. हौसेनें तुला पुढच्या जागेवर ऐटदार बसविलें. मी व बाबा मागें बसलों व मोटार चालूं झाली. असें याच वाटेनें टिळक पूल चढूं लागलों. बाबांच्या व माझ्या सुखदुःखाच्या गोष्टी चालल्या होत्या. टिळक पुलाचा उतार ओसरला व मोटार कोतवाल बगीच्याला वळसा घालून निघाली.

अशीच मोटार प्लाझा सिनेमावरून माहीम रस्त्यानें जाणार होती. पण याच प्लाझा-चौकांत धाड् असा आवाज झाला व मोठा अपघात ओढवला. तो दिवस आठवला व हें ठिकाण पाहिलें म्हणजे अजून अंगावर शहारे उठतात.

आपली मोटार माहीम रस्त्याकडे वळत होती त्याच वेळीं एक बस प्लाझावरून पुलाकडे जात होती. काय झालें कोणास माहीत. मोटार व बस यांची टक्कर झाली व तो भयंकर अपघात या चौकांत घडला.

आजूबाजूच्या दुकानांतून लोक धांवत निघाले. बगीच्यांतील मुलांचे खेळ थांबले. सिनेमा पाहावयास आलेल्यांची रांग मोडून गेली. हातगाड्या, सायकली, व्हिक्टोरिया जागच्याजागीं थबकलीं. घरांच्या सज्जांतून स्त्रीपुरुषांचीं डोकीं डोकावूं लागलीं. अपघाताच्या ठिकाणीं दाट गर्दी जमली. पोलीस धांवत आले व दंडु-क्यांनीं हटवाहटवी सुरू झाली.

बसचा बराच भाग वेडावांकडा झाल्यामुळें ती बंद पडली होती. आपल्या मोटारीच्या पुढच्या भागानें चांगलाच मार खाल्यानें इंजिन मोडून पडलें होतें. कांचा सर्व फुटून गेल्या होत्या. चाकांनीं आकार टाकून दिलेला होता. टपानें आकाशांत उड्डाण केलें होतें. ड्रायव्हरनें उडी मारल्यामुळें तो बचावला होता. मला व बाबांना सपाटून धक्के बसले व आम्ही ठेंचून निघालों. पण तुझी काय अवस्था त्या वेळीं झाली ? फुटक्या कांचांचे भाग शरिरांत शिरून सर्व अंग रक्तबंबाळ झालें होतें. हातपाय पसरले आहेत; तोंडाचा ' आ ' वासलेला आहे, सुकाणूचें चाक छातीवर दाबून बसलें आहे; चळवळ नाहीं वळवळ नाहीं सर्व निश्चेष्ट. मी घाबरून गेलें. बाबांची गाळण उडाली. आम्हास वाटलें तूं सोडूनच गेलास. मला वाटलें मी कशास माहेरास आलें ? घरीं गेल्यावर आईस काय सांगावें ? डोकें भणाणून गेलें. काळीज भेदरून गेलें. कांहीं सुचेना. पोलिसांनीं एक टॅक्सी आणली व तुला घेऊन आम्ही के. इ. एम्. हॉस्पिटलमध्यें आलों. डॉक्टरांनीं अपघाताची केस म्हणून ताबडतोब हातांत घेतली. तुला तपासलें आणि तूं जिवंत आहेस, हें सांगितल्यावर आम्हाला किती आनंद झाला ? डोक्यावरचें एकदम ओझें उतरल्यासारखें झालें. आम्ही उसासे टाकले व पांच मिनिटें शांतपणें बांका-वर रेलून पडलों.

" ठिकठिकाणीं जखमा आहेत पण किरकोळ स्वरूपाच्या आहेत. धक्का जोरांत

बसल्यानें मुलगा बेशुद्ध पडला आहे. आतां तो शुद्धीवर आला आहे. घाबरण्याचें कांहीं कारण नाहीं. भेटून जा. दोन तीन दिवस येथें मुलाला ठेवावें लागेल.— ” असा निरोप मिळाला. गरूडाच्या झेंपेनें आम्ही धांवत गेलों. तुला डोळे भरून पाहिलें. मी तुझ्यापाशींच राहिलें व बाबांना घरीं जाण्यास मी सुचविलें. जातांना पांच रुपयांचे पेढे मारुतीस दाखवा व मग घरीं जा म्हणूनहि सांगितलें.

तो पेढे वांटलेला तूं आज मला भेटतो आहेस. बाबांची मोटार पाहून व बाबांची सावधगिरीची सूचना ऐकून मी जी किंचाळलें ती यामुळें.

---

## ( २ ) मी पाहिलेला हुतुतूचा सामना

लोकांना एवढा क्रिकेटचा प्रेमा कां ? पिंगपाँगच्या टेबलाभोंवती सारखी गर्दी ! टेनिस बॅट घेतली कीं निघाले टेनिस कोर्टावर. बॅडमिंगटनचीं फुलें उडवावयाला एका पायावर तयार. इतकी कां विदेशी खेळाकडे ओढ तें समजत नाहीं. आपले देशी खेळ कां कमी प्रतीचे आहेत ? पण फॅशन पाहिजे ना ! पोषाखांची व साधनांची ऐट आपल्या खेळांत नाहीं. हातापायाच्या काड्या असल्या तर फॅशनखालीं त्या झांकल्या जातात. विदेशी खेळ खेळतांना बरगड्या मोजावयाला कोण येतो ? आमचे देशी खेळ म्हणजे शरिराच्या अवयवांचा उघडा बाजार. जितकें शरीर अधिक उघडें तितकी खेळांत अधिक मौज व डौल. खेळ व्यायामाकारितां. व्यायाम शरीरसौष्ठवाकरितां. शरीरसौष्ठव झांकून वाढत नाहीं. अंगांतला कुडता फेंकून देऊन लंगोटबंद गडी हुतूतू घालीत जातो तेव्हां त्याचेकडे पाहा. पाहाणारा क्षयरोगी सुद्धां शुक्राचार्यांची संजीवनी प्याल्यासारखा होईल.

आमच्या शाळेचा आणि के. इ. एम्. शाळेचा हुतुतूचा सामना एकदां झाला. नऊ गडी उत्तम असे शोधून काढले होते. वजनानें मोठे व मांड्यांनीं पिळदार असे दोन गडी निवडले. अंगांनीं सडपातळ व बिजलीसारखे लवणारे दोन गडी घेतले. हुतुतूचा दम घालणारे दोन चिरंजीव होते. दोन ससांचीं पिलें होतीं. म्हणजे उंचीनें ठेंगू पण गतीनें भुर्कन् इकडून तिकडे वावरणारे आणि एक पुरा उंच आजानुबाहू होता. सहज हात फिरवला तर दूरचे एक दोन गडी हमखास बाद करीलच. प्रतिस्पर्ध्यांनींही गड्यांची निवड मोठ्या कसोशीनें केली होती.

खेळण्याचें पटांगण पाणी शिंपडून फोफाटाविरहित केलें होतें. सडा टाकून रांगोळ्या घालाव्यात त्याप्रमाणें पांढरी फक्की मर्यादेच्या रेषा दाखवीत होती. दोन शाळांचीं मुलें दोन बाजूंना शिस्तीनें शांत बसलीं. खेळगड्यांनीं क्वार्टरपँट व सँडो शर्ट परिधान केले. एका संघानें आपल्या छातीवर तांबडे नंबर लाविले. दुसऱ्यानें हिरवे नंबर स्वीकारले. नायकांनीं आपआपले गडी रांगेनें मर्यादारेषेपाशीं बसविले होते.

दोन पंच दोन बाजूंना समानरेषेपाशीं शिट्ट्या घेऊन तयार उभे होते. दोघांमध्यें विरोध आला तर अखेरचा निर्णय देण्यासाठीं सरपंच हजर होते. एका बाजूस एक टेबल व दोन खुर्च्या मांडल्या होत्या. तेथें गुणलेखक व वेलाधिकारी बसले होते. वेलाधिकाऱ्यांच्या हातांत सेकंद व मिनिटें दाखविणारें घड्याळ होतें. सर्व अधिकारी सज्ज राहून सुरवातीची वाट पाहात होते.

सरपंचानें ओलीसुकी केली. आमच्या शाळेनें कौल जिंकला. पाहिजे अस- लेल्या जागेंत आमचे खेळाडू जाऊन उभे राहिले. हुतुतू घालणारा प्रतिस्पर्ध्यांचा गडी समानरेषेजवळ शिट्टीची वाट पाहात राहिला. शिट्टीची रणभेरी वाजली व २० मिनिटांचा पहिला डाव सुरू झाला.

भूमिमाईला नमस्कार केला व हा पहिला मारुती हुतुतू घालीत उड्डाण करूं लागला. आमच्याकडील एका पठ्ठ्यानें वज्रासारखी झडप त्याच्यावर टाकली. पण कांहीं उपयोग झाला नाहीं. हनुवटी वांकडी करून हनुमान निसटला. टाळ्यांचा कडकडाड झाला. प्रतिस्पर्ध्यास दहा गुण मिळाले व आमचा एक गडी बाद. तोडीस तोड म्हणून आमच्याकडील बहीरीससाणा हुतुतू करीत जो तीरासारखा उडाला तों थेट मध्यगड्यावर चोंच मारून चटकन मागें सटकून आला. आमच्याकडील टाळ्या सुरू झाल्या. वीरश्री वाढत चालली आणि खेळास रंग चढूं लागला. प्रतिस्पर्ध्यांनीं दोन गड्यांची सांखळी करून आमचा अभिमन्यु घेरला; तर आमच्या घटोत्कचानें त्यांच्या लक्ष्मणास वरच्यावर खांद्यावर घेऊन पाठीमागच्या मर्यादारेषेबाहेर पोहोंचतें केलें. आमच्या सशानें तर बहार केली. एकदां कसा चुटदिशीं पुढें सरकला व प्रतिस्पर्ध्यांच्या गुढग्याला घोरपडीप्रमाणें चिकटून बसला तें कळलेंच नाहीं. जागचे हालतां येईना व पुढें ओढावें तर इतर गाड्यांचा तट उभा.

वीस मिनिटांनीं डाव बंद झाला. खेळगड्यांकडे लिंबाच्या फोडी व लेमनच्या गोळ्या धाडल्या गेल्या. शिक्षक जागा सोडून आले व पराक्रमी वीरांच्या पाठी थोपटल्या गेल्या. गुणलेखकानें आपला हिशोब सादर केला व फलकावर निकाल जाहीर झाला. आम्हास १७० गुण व के. इ. एस्. शाळेस १९० गुण मिळाले. वीस गुणांनीं आम्ही कमी पडलों व प्रतिस्पर्धी हर्षानें नाचूं लागले. पण आम्ही शिस्त सोडली नाहीं. शांतता राखली व पुढच्या डावाची आतुरतेनें वाट पाहात राहिलों.

विश्रांतीचीं पांच मिनिटें संपली व दुसरा डाव सुरू झाला. ह्या डावांतील धमालधम तर विचारूंच नका! दोन्हीकडे जणूं वायुगोळे सुटत होते 'खा' 'खा,' करीत वाघांच्या झडपी सुरू झाल्या. 'फों' 'फों' करीत नागांचे फूत्कार निघूं लागले. 'धर कीं पकड' सुरूं झाली. गड्यांना तिळभर उसंत मिळेना. श्रमला, थांबला कीं मेला. एकाद्या स्टंट पिक्चरप्रमाणें हालचाल होऊं लागली. कोण किती पकडतो व किती मारतो, याची दाद लागेना. गुणलेखक व सरपंच होते म्हणून बरें.

होतां होतां हाही २० मिनिटांचा डाव संपला व फलकावर आमच्या नांवें २३० व के. इ. एस. च्या नांवें २०० चा आंकडा लागला. किती आनंद झाला त्या वेळीं! पण आमचे खेळगडी बेहोष झाले नाहींत. प्रतिस्पर्ध्यांच्या गड्यांनींही पुढें येऊन आमच्या गड्यांशीं हस्तांदोलन केलें व जयजयकार केला. त्यांच्यापैकीं एकजण तर आमच्या सशाला खांद्यावर घेऊन नाचला. याला म्हणतात खेळाडू.

शांततेनें सर्व मुलें घरोघर गेलीं. आमचे खेळगडी थोडा वेळ थांबले होते. शाळेतर्फे अल्पोपहार देऊन त्यांचें अभिनंदन करण्यांत आलें.

वीस आणि वीस एकूण चाळीस मिनिटांचा खेळ! किती मौजेचा व बहारीचा असतो! सात अंकी उजाडेपर्यंत चालणारा 'राक्षसी महत्त्वाकांक्षेचा खेळ' आतां मागें पडला. हप्त्याहप्त्यानें चालणारा 'एडीपोलो सिनेमा,' माणसांना आवडणार नाहीं. 'थोडक्यांत पण सुरेख' असे कार्यक्रम पाहिजेत. मग अशा प्रकारांत मोडणारा आमचा हुतुतूचा देशी खेळ आवडणारा असूं नये कां?

# ७. चिंतन

## (१) दारूबंदी (२) आपण आपल्या पूर्वजांच्यापेक्षां अधिक सुखी आहोंत काय ?

### कसें लिहाल ?

विषयाची कल्पना नीटपणें मांडली पाहिजे. त्यामध्यें जर कांहीं शंका अथवा श्लेष असतील किंवा उत्पन्न होत असतील, तर ते प्रथम स्पष्ट करून घेतले पाहिजेत. जें टाळावयाचें असेल, तें 'टाळीत आहोंत,' असें स्पष्टपणें सांगून टाळलें पाहिजे. थोडक्यांत म्हणजे दिलेल्या विषयाच्या मर्यादा नीट आंखून घेतल्या पाहिजेत. याला उपोद्घात किंवा विषय-प्रतिपादन म्हणतात.

यानंतर त्या विषयाच्या अगदीं विरुद्ध असलेली बाजू प्रतिपादावी. विरोधहि तसाच निःसंदिग्ध प्रतिपादन केलेला असावा. त्या विरोधप्रतिपादनामुळें विषयाचें स्वरूप अधिक स्पष्ट होत असतें.

विषयाचा विस्तार करीत असतांना वाक्यें लहान लहानच योजावींत. कारण त्यामुळें कल्पना लौकर स्पष्ट होते. आणि अलंकार शिरत नाहींत; तसेंच चुकूनहि आपल्या प्रतिपादनाच्या विरुद्ध आपलाच शब्द लिहिला जात नाहीं. त्यामुळें प्रतिपक्ष्याला आपल्या लिखाणांत चूक दाखविण्यास भुसभुशीत जमीन सांपडत नाहीं.

असा विस्तार करीत असतांनाच दोहोंचे गुणदोष वर्णन करावेत. हे गुणदोष सहज समजण्यासारखे असावेत. ते सामान्य वाचकालाहि पटण्यासारखे असावेत. शब्दांचा कीस काढीत पांडित्य दाखवीत असूं नये. न पटणारीं उदाहरणें किंवा विधानेंहि घेऊं नयेत. आपण एका पक्षाला बांधलेले आहों असेंहि दिसून येऊं नये.

शेवट करीत असतांना त्या विषयाच्या विरुद्ध मत असलें तरी तें ठासून पण थोडक्यांत स्वतंत्रपणें मांडावें.

**या तऱ्हेच्या निबंधांत लेखकाचे विचार महत्त्वाचे असतात.** ते विचार प्रगटपणें **मांडण्याची पद्धत गौण** असते. म्हणून ते विचारच अधिक ठसवून सांगण्यासाठीं अत्यंत स्पष्टपणें मांडलेले पाहिजेत.

असें लिहिलेलें आणखी कोठें मिळेल ?

क्रेसरींतील निवडक निबंध; आगरकर निबंध-संग्रह; केळकरांचे टीकालेख; इंदु काळे व सरला भोळे; अबलोन्नतिलेखमाला; निबंधमाला;—इ.

याप्रमाणें लिहून पहाल कां ?

१ शाळांतील अभ्यासक्रमाचा बदल; २ युद्धें संपविण्यासाठीं युद्धें; ३ शास्त्रांचा अभ्यास काव्याला अनुपयुक्त आहे काय ? ४ आधुनिक स्त्री; ५ विद्यार्थी व राजकरण.

---

## ( १ ) दारूबंदी

दारूबंदी करावी, असें महात्माजींनीं आग्रहानें प्रतिपादिलें. त्यापासून झाला तर लाभच होईल आणि लाभ नाहीं झाला तरीहि पण दारू बंदच केली पाहिजे असेंच आग्रहानें सांगितलें. देशी व विलायती कोणतीहि दारू वाईटच आणि तिनें नुकसानच होतें आणि ती दारू बंद केल्यास सर्वच दृष्टींनीं फायदा हाईल असे समजावून दिलें. तें मत खरोखरच काय आहे त्याची विचार करण्याची वेळ आत ।आलेली आहे.

दारूबंदी करूं नये असें कोणीहि -.प्रतिपादन करीत नाहींत. फक्त प्रश्न इयत्तेचा आहे. किती दारू बंद करावी, कोणती दारू बंद करावी, हाच वाद-विवादाचा किंवा मतभेदाचा प्रश्न आहे. ' दारू प्यावी ' असें कोणीहि म्हणत नाहीं. विरोधकांचें म्हणणें असें कीं दारू पिण्याला बंदी पाहिजे. याचा अर्थ इतकाच कीं दारूच्या थेंबालाहि स्पर्श करूं देऊं नये असा नव्हे. परिमित प्रमाणांत ती वापरावी. प्रमाण कमी कमी करावें.

दारूबंदी हा प्रश्न, खरें पहातां, नैतिक महत्त्वाचा राहिलेला नसून त्याला कांहीं काळ राजकीय महत्त्व प्राप्त झालेलें होतें; आणि या काळांत त्याला आर्थिक महत्त्व प्राप्त होत आहे. दारूपानामुळें मनुष्य बेशुद्ध होतो आणि पशूंप्रमाणें ` करूं लागतो, हा नैतिक प्रश्नाचा एक भाग झाला. दारू पिण्याचें व्यसन जडल्यामुळें आपल्या कुटुंबव्यवस्थेला तो व्यसनी पुरुष विस्कळित करतो

आणि आपल्या स्वतांबरोबरच कुटुंबांतील प्रेमळ धाम्यादोऱ्यांनाहि विस्कटावितो, ही नैतिक प्रश्नाची दुसरी बाजू झाली. तो दारूबाज स्वतां कंगाल होतो, आपल्या मुलाबाळांना सक्तीनें कंगाल करितो आणि फसव्या व जळूप्रमाणें पिळणूक करणाऱ्या यंत्रांत त्यांना अडकवून टाकतो किंवा त्यांना समाजांतील पैसे मिळविण्याचे भलेबुरे उपाय योजावयाला भाग पाडीत असतो; ही नैतिक प्रश्नाची तिसरी बाजू झाली. हा सर्व विनाश टाळण्याला सक्तीनें ती दारूच बंद करावी असें नैतिक प्रश्नाच्या वतीनें प्रतिपादण्यांत येतें. हें प्रतिपादन खोटें नाहीं; पण ती सक्ति खोटी आहे सक्तीनें व्यसन नाहींसें होत नाहीं, उलट तें वाढत जात असतें.

दारूबंदीचें राजकीय महत्त्व असें होतें : देशी दारू जास्त माज आणते, म्हणून प्रतिष्ठित लोक विलायती दारू घेत. त्यानें उन्माद येत असलाच, तर तसल्याच प्रतिष्ठित लोकांच्या सहवासांत येई. त्यामुळें पशुवर्तनाचा डंका रस्त्यावर गाजला जात नसे. तेव्हां या लब्धप्रतिष्ठ लोकांना विलायती दारू आवडूं लागली. तिचा खप वाढूं लागला. पण त्यामुळें राज्यकर्त्यांची चंगळ होऊं लागली. म्हणून विलायती दारू ( तरी ) नको, असा पर्याय करून, त्या दारूबंदीस राजकीय स्वरूप देण्यांत आलें. पण या प्रचाराचा फारसा उपयोग झाला नाहीं. त्याला तोड म्हणून असें प्रतिपादण्यांत येऊं लागलें कीं विलायती दारूवर जबरदस्त जकात बसवावी. त्यायोगें ती दुर्मिळ होईल. ती सामान्य लोकांच्या कक्षेंत येणार नाहीं आणि सरकारास खर्च करण्यास थोडा अधिक पैसाहि प्राप्त होईल. पण याहि विधानांचा फारसा प्रभावी उपयोग झाला नाहीं. उपयोग म्हणावयाचाच तर असा झाला कीं दारूच्या आयातीनें उत्पन्न वाढविण्यांतच येऊं लागलें. दारूबंदी त्या दृष्टीनेंहि निष्फळच ठरली.

आर्थिक कारण आतां जें देण्यांत येत आहे, तें पूर्वी दिलें जात होतें त्यापेक्षां अगदींच निराळें आहे. आतांचें दिलें जाणारें कारण अधिक सयुक्तिक आहे आणि विचार केल्यास सहज पटण्यासारखें आहे. पूर्वी विरोधक असें म्हणत कीं, 'दारूबंदी केली तर जकातीचें येणारें सुमारें ४ कोटींचें उत्पन्न नाहींसें होईल. तितक्या पैशाची भर दुसरीकडून करावयाची म्हणजे येथल्याच प्रजेवर आणखी कर वाढवावे लागतील. तेव्हां गणितानें विचार करतां ८ कोटींचें उत्पन्न गमवावें लागेल.' 'दारूबंदी करावीच करावी,' असें दारूबंदीचे आग्राहक प्रचारक

आज आर्थिक दृष्टीनें विचार करून असें मांडीत आहेत कीं ' दारूपासून परावृत्त केल्यानें त्या माणसाची कार्यशक्ति वाढेल, त्यामुळें उत्पन्न अधिक होईल. कुटुंब-संस्थेचा होणारा ऱ्हास थांबेल, आणि समाजाच्या इतर उत्पादक घटकांवर होणारा ताण थांबेल, त्यामुळें त्याच कुटुंबांतील अर्थव्यवस्था स्थिर राहील. तें कुटुंब आर्थिक दृष्ट्या स्थिर झाल्यानें त्या सर्वांचीच क्रियाशक्ति वाढीस लागेल. इतके दिवस ती क्रियाशक्ति समाजविद्रोहाचे कांहीं तरी कामांत गुंतलेली असे. हा समाजविद्रोह थांबला कीं सरकारला तिजोरीवर आहे यापेक्षां भार द्यावा लागणार नाहीं आणि द्यावा लागलाच तर प्रजेचा घटक मजबूत असल्यानें भार टाकणें सुसह्य होईल. तेव्हां कालांतराच्यां शाश्वत स्थैर्यानें विचार करतां आज उत्पन्न गमावूनहि दारूबंदी करणेंच योग्य आहे. '

हें यांचें विधान पटण्यासारखें आहे आणि त्यासाठीं ' दारूबंदी करावी ', हें म्हणणेंही योग्य वाटतें. पण आतां प्रश्न राहिला तो साधनांचा. दारू बंद कशी करावयाची ? आतां विवाद उरला आहे तो साधनासंबंधीं.

ज्याप्रमाणें परशुरामानें एकवीस वेळेला ठार मारले तरी क्षत्रिय जिवंतच राहिले किंवा परमेश्वरानें दहा अवतार घेऊन दुष्टांचा संहार करण्याचा प्रयत्न केला तरी पण ते अद्यापहि उरलेलेच आहेत, त्याप्रमाणें सक्तीचे कितीहि कायदे केले, तरी दारू बंद होणें शक्य होणार नाहीं. कारण सक्तीनें गुन्हा दडपला जातो, नष्ट होत नाहीं. कायदा असूं नये असें नव्हे, पण ' दारू पिऊं नये, ' असा कसा कायदा होईल ? सक्तीच्या बरोबरच लबाडी जन्म पावत जाते. याप्रमाणें ही कायदा करणें व कायदा मोडणें यांची पाठशिवणी चाललेली असते. त्यांची गांठ पडणें मुष्कील.

सक्तीच्या शिवाय असलेला दुसरा मार्ग म्हणजे शिकवणुकीचा. दारूबंदीचे लाभ समजले आणि दारूबंदीचे परिणाम दिसले म्हणजे योग्य तो उपाय योजला असें घडेल. पण हा शिकवणुकीचा उपाय अत्यंत दीर्घ कालानें फलद्रूप होणारा आहे. त्याचें तात्काळ फल कांहींहि नाहीं. आणि समाजाची इतका काळ वाट पहाण्याची तयारी नाहीं. आणि खरें म्हटलें तर इतका दीर्घ काळ लावणें कदाचित् विनाशकारीहि ठरेल.

तिसरा एक मार्ग आहे. तो करून पहाण्यासारखा आहे तो मार्ग असा— दारू पिण्याचें कारणच नष्ट करणें. माणूस दारू पितो, तें व्यसन म्हणून नव्हे.

व्यसन त्याला जडतें, तें मूळचें नसतें, हें नीट लक्षांत ठेवलें पाहिजे. दमल्या शरिराला तात्काळ तजेला देणारें औषध किंवा होत असलेल्या दुःखाचे चटके शमविण्याचें एक प्रभावी औषध, याच भावनेनें माणूस प्याल्यामागें प्याले झोकीत असतो. ‘ दमलेल्या शरिराला ’ जर दुसऱ्या कांहीं कारणानें विसावा मिळेल किंवा ‘ दुःखानें होरपळलेल्या ’ मनाला जर विसरण्यासारखें दुसरें कांहीं हाताशीं सहज मिळेल, तर माणूस सहसा दारू पिणार नाहीं. समाजांत आज कांहीं कृत्रिम कारणांनीं येत असलेली गरिबी आणि हलाखी जर योग्य त्या उपायानें नाहींशीं केली ( ती करता येणें अगदीं शक्य आहे), तर दारूबंदीहि सहज साध्य होईल. त्यासाठीं इतकें प्रतिपादन करावयास लागणार नाहीं.

---

## ( २ ) आपण आपल्या पूर्वजांपेक्षां अधिक सुखी आहोंत काय?

हा विषय जरा घोंटाळ्यांत पाडणारा आहे. सुखी आहोंत कीं नाहींत? हा मोघम प्रश्न आहे. ‘ आमचे पूर्वज ’ म्हणजे किती पिढ्या मागें? त्याचा नीट अर्थबोध होत नाहीं. सामान्य रीतीनें समजावयाचें तर असें मांडतां येईल : पूर्वीं आपण या सुधारणायुगांत वावरत नव्हतों आणि आज या नवीन नवीन सुधारणांत वावरत आहोंत. पूर्वीं मानवी कष्टांनीं सुख मानण्याची प्रवृत्ति होती; आतां मानवी कष्ट वांचविण्याची प्रवृत्ति आहे. तेव्हां या दोहोंतील हितप्रद आणि योग्य काय आहे?

सुख हें मानण्यावर आहे. सुख ही खरी वस्तूच नव्हे. जी वस्तु कांहीं क्षण सुखाची वाटते, तीच वस्तु कांहीं क्षणांनीं सुखाची वाटेनाशी होते. असें हें सुख ‘ नित्य नवें ’ असल्यानें पूर्वींच्या लोकांच्या सुखाशीं आतांच्या लोकांच्या सुखाची तुलनाहि करतां येणार नाहीं असें कांहीं लोक म्हणतील आणि त्यांचें म्हणणेंही कांहीं खोटें नाहीं. शिवाय असेंहि म्हणतां येईल कीं ज्या जातीचें सुख पूर्वींच्या लोकांना आस्वादावयासच मिळालें नाहीं, त्यासंबंधीं बरेवाईटपणा कसा काय सांगतां येईल? एकादी वस्तु मिळाली तर सुख किंवा दुःख कांहींच नाहीं. पण ती मिळालेली वस्तु गमावली म्हणजे मात्र दुःख होतें. इंग्रजींतील Blind boy ची

कविता सर्वांच्या परिचयाची आहे आणि त्याप्रमाणें या ‘ पूर्वजांच्या ’ बाबतींत कांहीं घडलेलें नाहीं. मग तुलनाच कशी संभवेल ?

त्यावर असें उत्तर देतां येईल : मानवी मन हें सर्व प्रकारें सर्व स्थितींत व सर्व काळीं सारखेंच राहाणारें आहे. तें संस्कारानें कमीअधिक संवेदना धारण करीत असेल. पण त्या मनाचा प्रवृत्तिधर्म सदा सर्व काळ सारखाच असणार. म्हणजे असें : आज साखर आपणांस मुबलक प्राप्त होते. ती गोड आहे. पूर्वीच्या काळीं यंत्रसिद्धता नसल्यानें तितकी आणि तशी मिळत नव्हती. म्हणून ती गोड असणार नाहीं काय ? किंवा त्या माणसांना आजची साखर मिळाल्यास गोड वाटणार नाहीं काय ? दुसरें उदाहरण घेऊं : ताप आल्याबरोबर पूर्वी कांहीं झाडपाला देत आणि तापापासून होणारें दुःख नाहींसें करण्याचा प्रयत्न करीत. आजकाल झाडपाल्यापासूनच निर्माण केलेलीं कांहीं औषधें सेवन करून त्या तापाच्या त्या वेदनांतून त्यापेक्षां कमी वेळांत तो मुक्त होत असतो. प्राचीन माणसांना हीं आजचीं औषधें मिळालीं असतीं तर त्यांच्या वेदना कमी झाल्या नसत्या कां ? ‘ होकार ’ हेंच याचें सहजस्फूर्त उत्तर होय. आणखी एक उदाहरण घेऊं : आजकालहि रस्ते तितकेसे चांगले नाहींत. त्यावरून प्राचीन काळांतील रस्त्यांची कल्पना सहज करतां येईल. आजच्या रस्त्यावरून एका गांवाहून दुसऱ्या गांवीं जाणें तितकें सुखकारक नाहीं. पण आपण जेव्हां आगगाडीनें किंवा विमानानें प्रवास करितों, तेव्हां त्या तसल्या रस्त्यांचा आपणांस त्रास होत नाहीं. आपला वेळ वांचतो, आणि ठरविलेलें कार्यहि पार पाडणें सुकर होतें. अशीच सोय जर आपल्या पूर्वजांना मिळाली असती, तर त्यांच्याहि वांट्याला असेच लाभ आले नसते कां ? आपण आपल्यावरून कल्पना करून म्हणूं शकतों कीं त्यांचेहि त्रास वांचले असते. म्हणजेच निराळ्या शब्दांत आपण असें कबूल करतों कीं पूर्वजांच्यापेक्षां आपण अधिक सुखी आहोंत. मानवी प्रवृत्ति सारखीच असल्यानें ज्याबद्दल मला सुख वाटतें, त्या वस्तूबद्दल इतरांनाहि ( प्राचीन किंवा अर्वाचीन, कोणालाहि ) सुख वाटावें. मात्र इतकेंच कीं सुखाच्या संवेदनांच्या तीव्रतेंत कमी-अधिक असा फरक असेल.

पण हें वरील म्हणणें सर्वच ठिकाणीं सुसंगत ठरेल असें नाहीं. मनाच्या भावनांचा जेथें प्रश्न येईल, तेथें सुखदुःख अगदीं विरुद्धहि स्वरूप घेतील.

कुंकू लावणें ही पूर्वजांची आवश्यक बाब होती. कुंकू न लावण्याची फॅशन असणें, ही आजची मनाच्या सुखाची बाबत आहे. पूर्वीच्या लोकांना अस्पृश्यांना दूर लेखण्यांत कल्याण आहे असें वाटत होतें; आज त्याविरुद्ध स्थिति आहे. पूर्वजांना कोणत्याहि गाईत तेहतीस कोटि देव सांठविलेले दिसून येत; आजच्या लोकांना 'भाकड गाईची हत्या करण्यास प्रतिपादण्यांतहि' कांहीं विरोध वाटत नाहीं. हा भावनेचा प्रश्न आहे. त्यामुळेंच विरुद्धताहि संभवते. त्यामुळें सुखदुःखहि विरोधी असूं शकतील. त्यामुळें त्या बाबतींत तुलना करतां येणें शक्य होणार नाहीं. याचें उदाहरण घेऊं :

शिवाजी राजे रामदास स्वामींचे शिष्य होते असें मानण्यांत पूर्वजांना धन्यता वाटत होती आणि आतां शिवाजीच्याबद्दल वाटेल ते बोलण्या-लिहिण्यांत इतिहास-प्रीति दिसून येते. पावित्र्य ही वस्तु शरिराप्रमाणें मनाची आणि वाचेचीहि आहे. स्त्रीच्या अश्रूंसाठीं पूर्वजांनीं रक्ताचे पाट वाहविले आणि आज स्त्रीच्या जीवाचे हाल रस्त्यावरचा कुत्राहि खात नाहीं. कायावाचामनें आपण त्यांच्याशीं अपवित्रतेनें वागत आहों. यांत सुखी कोण ? ऐतिहासिक सत्य जाणल्यानें खरें-खोटेंपणा काय प्रगट झाला असेल तो असो. पण त्यामुळें आजच्या माणसाच्या सुखांत भर पडली असें मात्र वाटत नाहीं.

तेव्हां संकलितपणानें असें म्हणणें प्राप्त आहे कीं आपण आपल्या पूर्वजांच्या-पेक्षां सुखी आहोंत हें अर्धसत्य आहे. कारण आपण जसे सुखी झालों आहोंत, त्याप्रमाणें दुःखीहि झालेलों आहोंत.

---

# ८. मंडन

## ( १ ) इतिहास, ( २ ) प्राचीन मराठी काव्यें

कसें लिहाल ?

चिंतनपर निबंधाचाच हा एक भाग आहे. या ठिकाणीं या विषयाचें केवळ **मंडनच** करावयाचें असतें. आपण निःपक्षपाती राहाणें या ठिकाणीं योग्य नाहीं. हें वर्तमानपत्राच्या संपादकाला योग्य असें लेखन असतें.

या प्रकारांत **तत्त्वज्ञान सांगण्याचा आव आणून** लांब लांब वाक्यांतून समास, अलंकार, अवतरणें, कथानकें, इत्यादींनीं वाचकांची बुद्धि भुलवून टाकून, त्यांना आपण लिहितों तेंच म्हणणें खरें, असें भासवावयाचें असतें. अवतरणें देतांना, तीं आपणांस जुळतील तींच द्यावींत. क्वचित् ठिकाणीं प्रतिपक्ष्याचा उपहासहि करावा. पौराणिक किंवा ऐतिहासिक कथा आपणांस जुळतील अशाच स्वीकाव्यात, किंवा तयार कराव्यात. वाचक गोंधळून गेला पाहिजे; त्याला विचाराची उसंतहि न मिळावी.

या तऱ्हेच्या निबंधांत बहुश्रुतपणा, भाषेवरील प्रभुत्व आणि लेखनाचें कौशल्य या गोष्टी दिसून येतात, दिसून याव्यात..

असें लिहिलेलें आणखी कोठें सांपडेल ?

आगरकर निबंधसंग्रह; हिंदु धर्म व सुधारणा; विनायकराव सावरकरांचे लेख व भाषणें; आगरकर चरित्र, आळतेकरकृत; विविधवृत्तांतील प्रासंगिक लेख, अलमगीरालिखित; वत्सलावहिनींचीं पत्रें; इ.

याप्रमाणें लिहून पहाल कां?

१ हुंड्याची चाल बंद कधीं होणार ? २ निधर्मी राज्याची कल्पना; ३ खोटें बोलावें. ४ आजचें शिक्षण बदललें पाहिजे; ५ हिंदुस्थानांत आज हिटलर जन्मला पाहिजे; ६ परदेशी चित्रपट बंद करावेत; ७ काळा बाजार करणाऱ्याला फटक्याची शिक्षा द्यावी.

---

## ( १ ) इतिहास

इतिहास हा विषय इतका विस्तीर्ण आहे कीं तो चाळीस ओळींच्या मर्यादेंत बसणें अत्यंत दुरापास्तच होय. मराठी भाषेचे शिवाजी म्हणून आपणांस म्हणवून घेणाऱ्या कै. विष्णुशास्त्री चिपळोणकरांचा एतद्विषयक सांगोपांग चर्चिलेला लेखच याची साक्ष आहे.

शाळेतील शिक्षणांत या इतिहासशिक्षणाचा अंतर्भाव करावा, कीं करूं नये, हा एक जसा विवाद्य विषय आहे, त्याचप्रमाणें इतिहासच मुळीं लिहिला जावा

किंवा जाऊं नये, हाहि तसाच मतें भिन्न भिन्न असणारा विषय आहे. आपण ऋग्वेदाला अत्यंत प्राचीनतम इतिहास समजतों. सर्व पुराणें ऐतिहासिक आहेत, असें मत न्या. पार्जिटर यानें नमूद केलें आहे. महाभारत आणि रामायण, हे दोन इतिहासच आहेत, असें मत सर्वमान्य आहे. हें जसें सांगतां येतें त्याप्रमाणें असेंहि सांगतां येतें कीं वर उल्लेखिलेले सर्व ग्रंथ दंतकथात्मक असून इतिहासाचा व त्यांचा नाममात्रहि संबंध येऊं शकत नाहीं. इतकेंच नव्हे तर प्राचीन भारतीयांना इतिहासलेखन माहीतही नव्हतें असें जोरानें प्रतिपादण्यांत येत असतें. संस्कृत कवींनीं नाटकें लिहिलीं, त्यांत प्रस्तावनेमध्यें कवींनीं आप आपले उल्लेख केलेले आहेत; पण त्यांना इतिहास म्हणतां येणार नाहीं. कारण सर्वच कवींनीं आपली माहिती दिलेली नाहीं आणि जी कांहीं माहिती दिली आहे, ती इतिहासाला शोभेल अशी नाहीं.

इतिहासलेखनाची शास्त्रशुद्ध पद्धति ग्रीक लोकांनीं आचरिली. त्यांच्या संसर्गानें मुस्लीम राजकर्त्यांनीं ती पाळली. पण भारतीय राजवंशावळींत किंवा चरित्रग्रंथांत स्तुति आणि त्यामुळें अवास्तव अतिशयोक्त दंतकथांचाच मात्र भरणा सांपडतो. भोजराजा व कालिदास; वेतालपंचविंशति; पृथ्वीरायरासा किंवा हर्षचरित्र, इत्यादि इतिहासग्रंथ हे इतिहासाच्या शास्त्राला धरून नाहींत.

घडलेल्या हकीकतींची सुसंगत नोंद असली म्हणजे इतिहास होतो. 'इति ह आस,' ही त्या शब्दाची व्युत्पत्ति. चांगल्या हकीकतीबरोबर वाईट हकीकतींचाहि उल्लेख पाहिजे. नाहीं तर सर्व स्तोत्रग्रंथ आणि भक्तिविजय, नासिकेत कथासार आणि गुलबकावलि सुद्धां इतिहासग्रंथच ठरतील. त्यांमध्यें ऐतिहासिक कथा असतील, पण त्यांतील सर्वच कथाभाग इतिहासमय नाहींत हें खास.

इतिहास हा अनेकविध आहे. प्रत्येक वस्तूचाहि इतिहास आहे. इंग्रज लोक तर सर्व गोष्टींकडे इतिहासाच्या दृष्टीनें पहात असतात. त्यामुळें मूळ स्वरूपापासून कसा कसा उत्क्रांत बदल झाला हें कळून येतें आणि त्याच्या भावी प्रगतीचा मार्ग सामान्यपणें आंखता येतो. मुलांच्या बाबतींत तर हें फारच अलौकिकत्वानें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. मुलाच्या जन्मापासूनच्या सर्व प्रकारच्या बारीकसारीक सुद्धां संगतवार हकीकती लिहून ठेवण्यासाठीं सौ. शांताबाई माडगांवकर यांनीं 'माझें बाळ' या नांवाचें एक टिपण-बुक तयार केलेलें आहे. त्या

पुस्तकाची योग्यता तें प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय समजणार नाहीं. प्रसूतिगृहांतून, रुग्णालयांतून तक्ते लावण्यांत येतात, तो इतिहासच होत जातो. कारखान्यांतून कामांची नोंद केली जाते, तोहि इतिहासच. पण हा बनत जाणारा इतिहास असतो. याच्या योगानें सद्यःकालीन हकीकत समजून येते; पुढें कसें कसें घडून येईल, याचा अंदाज करतां येतो. पण मागील गोष्टींवर कांहींहि प्रकाश त्यामुळें टाकतां येत नाहीं. या इंग्रजी राजवटीनें आपण हें शिकत आहोंत, आपणांमध्यें मूळचें तें ज्ञान नव्हतें, हें खरें आहे.

कंपनींतील इंग्रजी लोकांच्या दैनंदिनी सध्यां प्रसिद्ध होत आहेत. त्यांच्यांतून आपल्या देशाच्या तत्कालीन घडामोडींच्या वार्ता संगतवार दिलेल्या आढळतात. त्या हकीकतींवरून आपल्या देशांतील माहिती आपणांला निःसंदिग्ध प्राप्त होत आहे. इतिहास लिहून ठेवण्याची पद्धति जर आपल्याला माहिती झाली असती, तर आज आपल्या देशांत प्रसृत झालेल्या विकृत हकीकती खरें समजून येऊन तात्काळ लोप पावल्या असत्या. 'शिवाजीला लिहितां येत होतें काय ? 'कलकत्त्याची अंधार कोठडी,' यासारखे विपर्यस्त प्रश्न फैलावले नसते आणि लोकांच्या वेळेचा अपव्यय थांबला असता; होत चाललेली बदनामी थांबवतां आली असती. इतिहास हा एक आवश्यक असा विषय आहे आणि त्याचा पद्धतशीर अभ्यास आणि लिखाण व्हावयास पाहिजे. तसलें ज्ञान आपण पाश्चिमात्य लोकांकडून घेतलेलें आहे आणि आपलाच इतिहास आपण दुसऱ्यांनीं सांगितल्याप्रमाणें वाचीत आहोंत, इतक्या गोष्टी जरी समजून आल्या तरी 'इतिहास' हा विषय समजला असें होईल.

---

## ( २ ) प्राचीन मराठी काव्यें.

मराठी भाषेंतील जीं कांहीं प्राचीन काव्यें आज उपलब्ध झालेलीं आहेत, त्यांचा साकल्यानें विचार करतां, तीं अगदींच तुटपुंजी आहेत, अथवा त्यांमध्यें अगदींच सौन्दर्य कमी आहे, असें कोणीहि म्हणूं शकणार नाहीं. मराठीची सर्व संपत्ति तिच्या प्राचीन काव्यांतच समाविष्ट झालेली आहे, असें म्हटलें असतां शोभेल.

ज्ञानदेवांनीं लिहिलेली ज्ञानेश्वरी मराठी भाषेतीलच काय पण जगाच्या वाङ्मयांतीलहि अमूल्य निधीप्रमाणेच आहे. आज सुमारें ७०० वर्षें तिची स्तुति मुक्तकंठानें होत आहे आणि पढिक आणि भाविक या दोघांनाहि ती डोलवीत आहे, तें तिच्यामधील आंतरिक तेजाच्या शिवाय असूं शकेल काय ? पैठणच्या एकनाथाचीं काव्यें रसिक मनाला अजूनहि भुरळ घालतात. एकनाथी भागवत जगांतील कोणत्याहि सरस काव्यापेक्षां कोणत्याहि गुणांत कमी नाहीं. एकनाथी भारुडें म्हणजे वेदान्तांतील कूट प्रश्न अगदीं भाविकपणानें मांडून दाखविलेले आहेत. हेंच पहाना—

मुंगी व्याली, शिंगी झाली, तिचें दूध किती ?
अठरा रांजण भरून उरलें, प्याले चौदा हत्ती ॥
आम्ही लटकें ना बोलूं ॥

रामदासांचा दासबोध माहिती नसेल, तर जीवनांतील 'श्रेय हरपलें' आहे असेंच म्हणावें लागेल. 'दासांनीं केलेला बोध' कीं 'दासांना केलेला बोध,' अशी विद्वत्तेची चर्चा पंडितांत चाललेली असली, तरी 'येथें मूर्ख शहाणे होती,' हें ठसठशीतपणानें सांगितलेलें आहे. तो दासबोध मराठींत आहे. रघुनाथ पंडिताचा एकमेव उपलब्ध ग्रंथ 'नलदमयंतीस्वयंवराख्यान'. त्याबद्दल काय सांगावें ? 'मराठीमध्यें अलंकारावर ग्रंथ नाहीं, तर तो हा मी रचीत आहे,' अशा प्रतिज्ञेनें लिहिलेला हा स्वतंत्र अलंकारविवेक आहे. पांडित्य, शास्त्र आणि रस यांचें संमेलनच जणुं येथें आहे.

लतेतळीं रुंदनिरुंद कालवे । गळोनि जेथें मकरंद कालवे
परागही सांद्र तयांत रंगती । तयांसवें भृंगतती तरंगती

हें एक उदाहरण त्या लयीचें दर्शन घडविण्यास पुरेसें आहे.

आणि आमच्या 'यमक्या वामनाला' कसें विसरतां येईल ? प्रगाढ विद्वत्ता आणि सांद्र रसालता एकत्रित झालेली आहे या ठिकाणीं. 'स्वभावोक्ति अलंकार तर हात जोडून समोर उभा ! त्याचें वर्णन त्याच्याच एका कवितेच्या चरणानें करतां येईल — 'वदवती न कवीसहि लोळ ते'. मराठी भाषा वामनानें अशी समृद्ध केली आहे. अमृतरायांचे कटाव, महिपतीचा भक्तिविजय, आनंदतनय

आणि कवि विठ्ठल यांचीं सीतास्वयंवरें, हीं मराठीभाषासुंदरीचीं विविध भूषणें आहेत. किती किती जणांचीं नांवें घेऊन निर्देश करणें शक्य होईल ?

जनाबाई, गोणाई आणि नामदेव आणि त्यांचाच अवतार असलेला महाराष्ट्रभाषाभूषण तुकाराम यांचीं काव्यें विसरून तरी कशी विसरतील ? यांच्या काव्यांत फक्त कवीचेंच मन हेंदाळून निघालेलें नाहीं, तर सर्वच काव्यवाचकांचें हृदय असेंच हेंदाळून निघत असतें. मराठीचा असा कोणीहि वाचक नसेल कीं, ज्याचें, हें काव्य वाचून, हृदय पिळवटून जाऊन डोळ्यांतून समाधानाची, आनंदाची अश्रुधार संतत वाहिली नसेल. श्रीतुकारामानें शेवटचें मागणेंहि किती प्रसादपूर्ण मागितलें आहे पहा—

हेंचि दान दे गा देवा। तुझा विसर न व्हावा.

वाचक भाविक असो कीं दांभिक असो, श्रद्धावान् असो कीं, श्रद्धाहीन असो, भक्त असो कीं पाखांडी असो, या मागणीनें त्याच्याहि अंतःकरणाला द्रव फुटावयाला पाहिजेच. भवभूतीच्या शब्दांत सांगावयाचें तर असें सांगतां येईल कीं, "अपि ग्रावा रोदित्यपि दलति वज्रस्य हृदयम्". तुकारामांनीं निर्वाणीनें पण प्रेमानें एकदांच सांगितलें आहे—

आणिक न ये माझ्या मना। हो का पंडित शाहणा॥

हें असलें मराठीचें प्राचीन काव्य आहे. त्याची थोरवी किती वर्णन करावी ? मराठी भाषा ज्यांनीं समृद्ध केली असा एक विद्वत्प्रकांड विसरून रहात होता. खरोखर अपराधच घडत होता. मोरोपंत त्याचें नांव. यांनीं रामायणाची कथा १०८ प्रकारें गुंफली. तरीहि तें पुन्हां म्हणतातच—

दशशतवदनांहि वाटतें गावें॥

आर्याभारतानें मराठी भाषेंत संस्कृतांतील सर्व भांडारच लुटून आणलें आहे. 'कर्णपर्व' प्रथम रचून त्यांनीं पडत्या मराठी काव्यांत वीरश्रीची ज्योत तेवविली. 'भाषांतर कविच' असें हीन पद प्राप्त व्हावयास नको, अशाच जणुं हेतूनें 'संशयरत्नमाला,' आणि 'केकावलि' रचिली. केकावलीचा अर्थ संपूर्णतेनें जाणून घ्यावयाचा असेल तर त्याला श्री. श्रीधर विष्णु परांजपे, यांची द्विभागात्मक

अनुक्रम १०४०७ १०-१-१९ नों. दि. २५/१९/४

केकावलि पहावयाला पाहिजे. स्त्रियांनीं कांहीं तरी भाकड गाणीं गाऊं नयेत म्हणून त्यांनीं ओवी-रामायण रचिलें. त्यांतील या ओव्या पहा—

यज्ञासाठीं भूमि, नांगरीता धन्या । सांपडली कन्या, सीतादेवी.
लक्ष्मण भावोजी मागें, पुढें स्वामी । मज आहे धार्मी; वाटतसे.

रामजोशीनें तर मराठींतील पहिली छेकापन्हुति राधासखिसंवादें रचिली. प्रभाकरकवीच्या शृंगारिक लावण्या मनामनाचा ठाव घेणाऱ्या आहेत. होनाजी बाळची 'घनःश्याम सुंदरा' ही भूपाळी आजहि सकाळच्या प्रहरीं गाइली, तर 'जनताजनार्दनाला' झोंपेंतून जागें करण्यास तितकीच समर्थ आहे. अनंत फंदी इत्यादि डफतुणतुण्याच्या कवींनीं तर 'कडकडे डफावर थाप' मारून सर्व मराठेशाही वीरश्रीनें फुलवून टाकिलेली होती. अशी ही मराठीची प्राचीन कविता आहे.

आणि जेव्हां कोणी विद्वान् म्हणतात कीं 'प्राचीन मराठी काव्यें नाहींतशीं झालीं, तर कांहीं नुकसान होणार नाहीं,' तेव्हां त्यांच्या ज्ञानाबद्दल हंसावें कीं कींव करावी, कांहीं समजत नाहीं. त्यांची उपेक्षा करणें, हेंच त्यांना सर्वथैव योग्य.

---

# ९. खंडण

## ( १ ) इंग्रजी हीच अखिल भारताची भाषा असली पाहिजे. ( २ ) अस्पृश्यता हा हिंदुधर्मावरील कलंक आहे.

कसें लिहाल ?

अशा प्रकारच्या निबंधांत उपहास हें प्रमुख अंग योजावयाचें असतें. वक्रोक्ति असेंहि त्यास म्हणतात. दिलेला मुद्दा अगदींच पोरकट आहे, असें तरी दाखवावें किंवा त्याचें अतिरंजित वर्णन केवळ कल्पनेनें करून, तो मुद्दयाचा बुडबुडा सहज फोडावयाचा, आणि उपहास दर्शवावयाचा. सुरवात एकदम थेट विषयाशींच. उपहास हा मध्य आणि अन्त्य प्रसंगाप्रमाणें ठरवावा. हे निबंध लिहितांना कमालीचें शब्दसौष्ठव आणि रचनापाटव आवश्यक आहे. हें असें लिहून

प्रतिपक्षी जिंकावयाचा तरी असतो किंवा निरुत्तर तरी करावयाचा असतो. खंडण केलें जात असलेली बाजू खरी असली तरी आपल्या शब्दसामर्थ्यावर ती बाजू खोटीच आहे, असें भासलें पाहिजे.

असें लिहिलेलें आणखी कोठें सांपडेल ?

वायफळाचा मळा; सुदाम्याचे पोहे; संपूर्ण बाळकराम; अच्युतराव कोल्हटकर यांचा स्मारक ग्रंथ; काळांतील निवडक निबंध; कवि गोविंदाची कविता– इ.

याप्रमाणें लिहून पहाल कां ?

१ वाङ्मयांत अश्लीलता आहे; २ पुणें विद्यापीठाचें माध्यम मराठी नसावें; ३ शिक्षण नोकरीसाठीं शिकणें प्राप्त आहे; ५ तुम्ही लांचलुचपत बंद करा; ५ स्त्रियांनीं नोकरी करूं नये; ६ खेड्यांत चला; ७ देशी धंद्यांना संरक्षण द्या; ८ अधिक झाडें लावा; ९ पुनः आम्हांलाच निवडून द्या; १० गुणाचें मोल कांहींहि नाहीं.

---

## (१) इंग्रजी हीच अखिल भारताची भाषा असली पाहिजे

अजूनहि कांहीं जुनाट खोडें या कल्पनेला चिकटून बसत आहेत याचें आश्चर्यच वाटतें. त्यांना अजूनहि वाटत आहे कीं इंग्रजांचें राज्य अजूनहि आपणांवर चालू आहे किंवा त्यांना असें वाटत असावें कीं पुन्हां त्या महाभाग गौरकायांचें आधिराज्य येथें प्रतिष्ठित होणार आहे.

हिंदुस्थान देश आणि भाषा इंग्रजी, यांचा समन्वयच ते कसा लावतात तें समजत नाहीं. हिंदुस्थानाला कांहीं मूळ भाषा नाहींच काय ? किंवा ती असूनहि आतां नसल्यासारखीच झालेली आहे ? किंवा तिला पुनः उत्थापनाचें सामर्थ्य नाहीं ? कीं तें पुनरुत्थापनाचें कार्य करणेंच अगदीं अव्यवहार्य आहे ?

हिंदुस्थान देशाला गौऊं शकण्याइतकी एक भाषा नसली, तरी पण इंग्रजीनेंच ती जागा व्याप्त करावी, हें म्हणणें पटतहि नाहीं आणि शोभतहि नाहीं. हिंदुस्थान हा एक विस्तीर्ण देश आहे आणि त्यांत निरनिराळ्या अशा शेंकडों भाषा प्रचलित आहेत. त्या भाषांच्या पैकीं एकादी भाषा प्रभावी ठरेल, आणि

कालांतरानें अखिल देशाची ती भाषा होऊं शकेल. तेथपर्यंत प्रादेशिक व्यवहार प्रादेशिक भाषांमधून चालवित आणि अखिल भारतीय व्यवहार सध्यांप्रमाणें इंग्रजींतूनच चालवित. पण हें व्यवहार म्हणून, आणि तेंहि कांहीं काल म्हणून. चिरकालीनपणें इंग्रजीचें स्वामित्व आतां इतःपर असूं नये.

कायदा, लष्कर, आणि व्यापाराची बाजारपेठ, यांचे व्यवहार आज इंग्रजींतून चालतात. पण कायदा प्रादेशिक असतो, आणि तो प्रादेशिक भाषेंतून चांगलाच ग्रहण करतां येतो. लष्करांतील हुकमाची व्यवस्था इंग्रजी आहे; पण अधिकाऱ्यांना इतर भाषा इंग्रजी राजवटींतहि शिकणें अपरिहार्य होतें हें विसरून कसें चालेल ? तसेंच आतांहि. व्यापार जागतिक आहे. त्यासाठीं इंग्रजी आवश्यकच आहे हें खरें. पण सर्वच हिंदवासी जागतिक बाजारपेठेंत उचापत करीत नाहींत. त्या विशिष्ट व्यापाऱ्यांनीं फार तर तसलीं इंग्रजी जाणणारीं थोडीं माणसें आपल्या सहकार्यास शोधावींत. नाहीं तरी आजचे सर्वच व्यवहारी इंग्रजीपंडित आहेत असें अभिमानानें खास सांगतां येणार नाहीं.

आणि इंग्रजी हीच जगांतील व्यापाराची भाषा आहे असेंहि म्हणतां येणार नाहीं. चीन, जपान हीं पौर्वात्य व्यापारी राष्ट्रें इंग्रजी जगाशीं संबंध ठेवतात, त्याचें कारण इंग्रजी ही त्यांची सार्वत्रिक भाषा आहे म्हणून नव्हे. त्या व्यापाऱ्यांचे कांहीं प्रतिनिधि इतर देशांत देवाण घेवाण करण्यासाठीं असतात. त्यांना थोडेसें इंग्रजी येतें, आणि त्या थोडक्या इंग्रजीनें काम भागतें हें दिसूनहि येतें. तोच न्याय हिंदुस्थानाला लागूं करणें अशक्य होईल काय ?

इंग्रजांनीं हा हिंदुस्थान देश एकत्रित सांधला, हें जरी राजकीय इतिहासानें खरें ठरलेलें असलें, तरी इंग्रजी भाषेबद्दल आपण इतकें ऋणी रहावयास नको आहे. अगदीं मोजक्याच लोकांना मोठ्या कष्टानें साध्य करण्यायोग्य ही इंग्रजी भाषा सर्वच लोकांच्या डोक्यावर बळजोरीनें लादणें केव्हांहि योग्य ठरणार नाहीं. या इंग्रजी भाषेनें आपलें सत्त्व आणि स्वत्व हीं हिरावून नेलेलीं आहेत. घरीं आईशींहि आपण इंग्रजी शब्द योजून बोलत असूं. लहान वयांत आपल्या मातृभाषेचा नीट अभ्यास न करतांच खास इंग्रजी शाळेंत इंग्रजी शिकून आपण आपले उच्चार बिघडविले, विचार बिघडविले आणि आचारहि बिघडविले.

राज्यकर्त्यांच्या भाषेंत आपण प्रवीण झालों आहों हें जाणून आपले लोक आपणास टाळूं लागले व त्यामुळें नसता मोठेपणा ( दिमाख ) पदरीं येऊं लागून आपण आपल्याच समाजांत भेद उत्पन्न करूं लागलों. आपल्या मूळ ग्रंथांचा तिरस्कार करूं लागून, जें जें इंग्रजी, तें तें योग्य, अशा ( गैर ) समजुतीनें आपण हिंदुत्वास पारखे होऊं लागलों होतों. तेव्हां ही इंग्रजी नष्ट होत आहे हें योग्यच आहे.

कोणचाहि व्यवहार कोणत्याहि परिस्थितींत रहात नाहीं. त्याप्रमाणेंच इंग्रज हिंदुस्थानांतून गेले, म्हणून कांहीं नित्य व्यवहाराचीं कामें थांबून राहिलीं नाहींत. बऱ्यानें होत आहेत, किंवा वाईटानें होत आहेत. अनुभवानें शहाणपण येईल. आज दिसत असलेले दोष कालांतरानें जातील. त्या दोषांच्यासाठीं कांहीं स्वातंत्र्य गमावणें इष्ट नाहीं. तीच गोष्ट इंग्रजी भाषेची. इतकी सर्वव्यापी एकादी भाषा आज जरी अस्तित्वांत नसली, तरी कालांतरानें तशी ती उत्पन्न होईलहि. पण म्हणून इंग्रजीच कायमची भारताची भाषा रहावी, हें असें म्हणणें केव्हांही योग्य नव्हे.

---

## ( २ ) अस्पृश्यता हा हिंदुधर्मावरील कलंक आहे.

या वाक्याचा प्रथम प्रयोग महात्माजींनीं केला. पण महात्माजींचे सर्वच प्रयोग बरोबर ठरलेले आहेत काय ? खादीच्या प्रयोगाबद्दल आतां नांवहि ऐकूं येत नाहीं. मिठावरील कर ! त्याची टर त्यांच्याच शिष्यांकरवी केली जात आहे. दारूबंदीचा फार्स सर्व लोकांना सुपरिचित आहे आणि 'छोटे भाई' चें प्रेम कसें अंगावर घडोघडीं उतू येत आहे तेंहि प्रत्येकाच्या निदर्शनास येत आहे. त्यांचा कोणता प्रयोग खरा होता आणि खरा ठरला आहे ?

हिंदुधर्मावरील कलंक म्हणून म्हणणें फार सोपें आहे. कारण हिंदुधर्म हा आजकाल बेवारशी धर्म आहे. ख्रिस्ती धर्मांतील किंवा मुसलमान धर्मांतील कांहीं अव्यवस्थित बाबतींत आपण कांहींहि बोलूं शकत नाहीं. त्याचें कारण एकच. त्यांच्या मागें पाशवी शक्ति उभी आहे. पण बिचारा हिंदुधर्म ! कोणींहि कांहींहि म्हणावें ! देवतांची टवाळी करावी, पुण्य पुरुषांची चेष्टा करावी, धर्मग्रंथांची

नालस्ती करावी आणि निरुपद्रवीहि सदाचाराची अवहेलना करावी. कोणीं कांहीं म्हणणार नाहीं, कोणीं कांहीं करणार नाहीं.

हिंदुधर्म हा विचार व आचार यांवर आधारलेला ऐतिहासिक धर्म आहे. धर्मकारण, राजकारण, समाजकारण असे तीन स्थूल भेद या हिंदुधर्मांत करतां येतील. अध्यात्म, पारलौकिक व चिरंतन विचार यांवर विचार करून औपनिषद तत्त्वांना यानें जन्म दिलेला आहे. शत्रुमित्र, चांगलेंवाईट, आहारविहारादि शरीरस्थितिधारण यांसंबंधीं विवेचन करून प्रत्येक वळणावर स्थितीप्रमाणें वळत आलेला हा प्रगमनशील धर्म आहे. आचारप्रभवो धर्मः। प्रत्येक माणसाला ऐहिक सौख्य मिळालेंच पाहिजे, असें अट्टाहासानें प्रतिपादणारा हा एकच धर्म जगतीतलावर आहे. 'आततायिनं आयांतं हन्य त् एवाविचारयन्.' असा शत्रूस ठार मारण्याचा आदेश करणारा हा एकच धर्म आहे. आपल्या स्वभावाप्रमाणें वर्तन केल्यानें संसिद्धि प्राप्त होते आणि त्याविरुद्ध वर्तन करण्याचा प्रयत्न केल्यास 'इतो भ्रष्टः, ततो भ्रष्टः' अशी त्रिशंकूप्रमाणें अवस्था होत असते, असें याच एका धर्मानें प्रतिपादिलेलें आहे. हा असा आचारधर्माचा राजकारण स्वरूपाचा एक भाग झाला. याच योजनेनें 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं' अशी स्थिति प्राप्त झाली. याचा अर्थच असा कीं इतिहासाच्या अनुभवानें याच धर्मानें नवीन रचना आत्मसात् केल्या. 'चांगलें ठरलें तें, किंवा चांगलें ठरेल तें' घेण्यास हिंदुधर्म केव्हांहि कचरला नाहीं. पितृसावर्ण्यपद्धति, किंवा मातृसावर्ण्यपद्धति, किंवा मुलांचे बारा प्रकार, किंवा लग्नविधीचे आठ प्रकार—या सर्व ठिकाणीं इतिहासानें जसा मार्ग दाखविला त्याप्रमाणें हिंदुधर्म प्रगमनशील होत राहिला. हें राजकारणधर्माचें अंग झालें, तसेंच हें समाजकारणाचेंहि अंग झालें. कोणत्या स्त्रीशीं विवाह करावा, येथपासून मुलीचें कोणतें नांव ठेवावें, येथपर्यंत सर्व समाजकारणाचा—वंश आणि बीजशुध्दीचा—विचार या हिंदुधर्मांत सांगितला आहे आणि शक्ति होती, तेथपर्यंत तो आचरूनहि दाखविलेला आहे. पतितांना पावन करणारा हाच धर्म आहे. वाल्या कोळ्याला वाल्मीकि ऋषि केलें याच धर्मानें. अशीं किती तरी उदाहरणें या धर्मांत सांपडतील. हा समाजकारणाचा भाग झाला.

या तीन कारणांनीं युक्त असलेल्या हिंदु धर्मामध्यें अद्यापपर्यंत अस्पृश्यता

राहिलेली होती. विचार करून इतिहासाच्या आवश्यकतेनें बदल पावत जात असणाऱ्याहि धर्मांत ही अस्पृश्यता इतकीं वर्षें राहिली होती, यांतच तिची योग्यता आहे. या पद्धतीनें समाजाची धारणा होत होती ना? यांतच तिच्या आवश्यकतेचें बीज धारण केलेलें आहे. समाज ज्या रीतीनें विस्कळित होणार नाहीं, तें समाजकारण-अंग हिंदुधर्मानें स्वीकारलेलें होतें. अस्पृश्यता हा समाजकारणाचा एक आवश्यक भाग आहे. तेव्हां ही अस्पृश्यता हिंदुधर्मावरील कलंक कसा होऊं शकेल? आणि महात्माजींनीं म्हटलें किंवा इतरांनीं बेच्छूटपणें तसें प्रतिपादिलें तरी तें मान्य कसें करतां येईल? अस्पृश्यतेचा आणि सामाजिक व्यवहाराचा संबंध आहे. ज्या समाजाला अस्पृश्यतेची आवश्यकता होती, तो समाज बदललेला असल्यास, अस्पृश्यताहि बदलूं लागेल. या अस्पृश्यतेचा आणि हिंदुधर्माचा काय संबंध? एका भागानें आवश्यक अंग म्हणून स्वीकारलेल्या एका पद्धतीमुळें अखिल हिंदुधर्माला कलंकित कसें करतां येईल? ही अस्पृश्यता हिंदुधर्मावरील तरी कलंक खास नव्हे.

---

# १०. सुवचनांवरील निबंध

## (१) नुपेक्षी कदा रामदासाभिमानी. (२) उद्योगाचें घरीं ऋद्धि सिद्धी पाणी भरी.

कसें लिहाल?

अगोदर त्या म्हणीचा किंवा सुवचनाचा अर्थ स्पष्ट करून सांगावा. त्यायोगानें विषयांतील कांहीं संदेह असेल, तर तो दूर होईल.

नंतर त्या म्हणीच्या तत्त्वाच्या समर्थनार्थ उदाहरणें द्यावींत. एकादी लहानशी गोष्ट किंवा अनेकांचीं अवतरणें. **यांपैकीं गोष्ट बरी.** ती स्वतंत्र रचिली, तरी कांहीं हरकत येणार नाहीं. मात्र त्या गोष्टींत म्हणीच्या तत्त्वाच्या स्पष्टीकरणाच्या शिवाय इतर विवेचनाच्या वादळांत सांपडूं नये. मग विवेचन लांबेल तरी, किंवा मुद्देसूदपणा तरी शिथिल होईल. अवतरणें देण्यास अगोदरचें पुष्कळ

वाचन लागतें आणि तें नेमकें आठवलें पाहिजे. अवतरणें ज्यांचीं असतील, त्यांच्याच नांवानें उल्लेख असावा. नाहीं तर थापेबाजपणा पदरीं यावयाचा.

गोष्ट संपल्यानंतर विरोधी मताचा **वाटल्यास** उल्लेख करावा आणि त्याचा थोडक्यांत परिहार करावा. अथवा हा विरोधाचा सर्वच भाग टाळून गोष्टींतीलच मुद्दा सारांशानें सांगून शेवट करावा, हा सोपा मार्ग आहे.

## असें लिहिलेलें आणखी कोठें सांपडेल ?

पंचतंत्र; हितोपदेश; इसाबनीति; खालील जिब्रानच्या गोष्टी; पांडवप्रताप, हरिविजय, नवनाथकथासार, वेताळपंचविशी, सिंहासनबत्तिशी—त्याचप्रमाणें आठवणींचे ग्रंथ आणि चरित्रें इ.

## याप्रमाणें लिहून पहाल कां ?

१ कां न सदन बांधावें कीं त्यांत पुढें बिळें करिल घूस ? २ कांट्यानें कांटा काढावा; ३ Fame is the food that dead men eat ; ४ आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां; ५ शक्तीनें मिळती राज्यें.

---

## ( १ ) नुपेक्षी कदा रामदासाभिमानी

हें रामदास स्वामींचें सुवचन आहे. याचा अर्थ अगदीं स्पष्ट आहे. राम हा जो देव आहे, तो आपल्या भक्ताचा कैवार घेणारा असतो. म्हणून तो त्या भक्तांवर जर कांहीं संकट आलें तर त्यांत त्या भक्तांची कधींहि उपेक्षा करीत नाहीं. तो त्या भक्तांचें रक्षण करतोच करतो.

या ठिकाणीं असें मात्र समजूं नये कीं राम हाच देव आपल्या भक्तांचें रक्षण करीत असतो; इतर कोणताहि देव त्याप्रमाणें रक्षण करीत नसतो. श्री समर्थ रामदास हे रामचंद्राचें उपासक असल्यानें त्यांनीं रामाबद्दल लिहिलें. तुकाराम महाराज विठ्ठलाचे भक्त असल्यानें ते विठ्ठलाबद्दल तसें म्हणतील. इतर कोणी इतर देवतांना आळवील. सांगण्याचा भावार्थ असा कीं देव आपल्या भक्तांचें संकटापासून रक्षण करीत असतो.

याविषयींची गोष्ट अशी सांगतां येईल —

एकदां समर्थ स्वामी रामदास महाराज काशीक्षेत्रीं गेले होते. त्यांच्याबरोबर त्यांचा शिष्यांचा परिवारहि होता. त्यांतील एका शिष्याची भिक्षेसाठीं जाण्याची पाळी होती. त्याप्रमाणें तो खांद्यावर झोळी टाकून- हातांत कुबडी घेऊन मनाच्या श्लोकांचा उच्च स्वरानें पाठ् करीत घरोघर भिक्षेसाठीं निघाला.

सकाळची वेळ. तो एका मोठ्या भव्य वाड्याच्या प्रांगणांत शिरला. त्यानें नित्यक्रमाप्रमाणें उच्चस्वरानें श्लोक म्हटला —

समर्थाचिया सेवकां वक्र पाहे
असा सर्व भूमंडळीं कोण आहे !
जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही
नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥

जय जय रघुवीर समर्थ ।

प्रशांत वेळीं मोठ्या आवाजांत गाइलेलें हें गीत ऐकून मन प्रसन्न व्हावयास पाहिजे होतें. प्रभुस्तुति ऐकून कोणाचें कान पवित्र होत नाहींत ? परंतु असें एक भूतमात्र त्या घरांत वावरत होतें. त्यानें स्नान केलेलें होतें. शुचिर्भूत होऊन तें देवघरांत जाऊन देवपूजेंत मग्न झालेलें होतें. तोंडानें मंत्रपारायण जपत होतें. पण चित्त ? कोणास ठाऊक ? त्या भूतमात्रांत हा खडा आवाज आणि ती स्तुति ऐकून संताप उत्पन्न झाला. त्यानें तडकाफडकीं देवघराचा त्याग केला आणि तें पाय हांपटीत बाहेर ओटीवर आलें. खेंकसलें तें त्या रामदासावर— कोण रे तुझा हा समर्थ ? त्याच्याकडे वक्र कोण पाहूं शकणार, असें म्हणतोस होय ? हा पहा मी वक्र पहातों. जा. तुझा अंतकाळ उद्यां सूर्योदयाच्या आंत होईल, असा माझा तुला शाप आहे. पाहूं या तुझा समर्थ काय करतो तें ? म्हणें—

समर्थाचिया सेवका वक्र पाहे
असा सर्व भूमंडळीं कोण आहे ?

तो बिचारा शिष्य घाबरून गेला. त्या काशीक्षेत्रांत या ब्राह्मणाची अशीच प्रसिद्धि होती. त्याचें म्हणणें खोटें होत नाहीं हाच प्रवाद सर्वत्र प्रचलित

होता. आपण उद्यां सूर्योदयाच्या आंत मरणार यांत तिळमात्र संशय नाहीं असेंच त्याच्या मनानें घेतलें; आणि आला तो तडक स्वामीजींपाशीं. झोळी कुबडी वगैरे फेंकून दिली आणि खिन्नतेनें महाराजांना निर्वाणीचें सांगूं लागला. मरणाचें दुःख किंवा भीति कोणाला वाटणार नाहीं ?

पण स्वामीजींना कांहींच समजेना. कालांतरानें चौकशी करतां खरी हकीकत समजून आली. तेव्हां त्यांना हंसूं लोटलें. पण त्यांच्या हास्यानें त्या शिष्याला अधिकच विषण्णता आली.

महाराज कांहीं म्हणाले नाहींत. त्यांनीं त्याला आपली सेवा करण्यास्तव मात्र निक्षून बजावलें. 'मी पुरे म्हणेंतोंपर्यंत येथून हलावयाचें नाहीं,' अशी आज्ञा देऊन स्वामींनीं त्याला आपले पाय चेपीत बसण्यास आज्ञापिलें.

बिचारा शिष्य. आज्ञा मोडतां येईना. बसला तेथेंच शेजारीं कांबळीवर पाय चेपीत. रात्र पडली, संपतहि आली. महाराज कांहीं पुरें म्हणेनात आणि याला कांहीं उठतां येईना.

अशाच सुमारास पहांटे यमदूत आले. ते त्या शिष्याला खुणावूं लागले. ते म्हणत – 'तूं या कांबळीच्या खालीं ये.' तो शिष्य अगोदरच घाबरलेला होता. यमदूतांना पाहून तो अधिकच भेदरून गेला. यमदूतांचें म्हणणें ऐकतांच त्यानें बरोबर त्याविरुद्धच वर्तन केलें. भेदरलेला मनुष्य असेंच करीत असतो. तो शिष्य त्या कांबळीलाच अधिक लगटून बसला. बराच वेळ झाला. मुदत संपली. ते यमदूत परत निघून गेले. त्या शिष्याला मात्र कांहीं कळलें नाहीं.

सकाळ झाली. स्वामी जागे झाले. शिष्य पेंगत होता, त्यास जागें केलें. नंतर त्यास आज्ञा केली कीं तूं लौकर शुचिर्भूत होऊन ये. तो शिष्य तेथून हलेना. त्याला ती कांबळी सोडवेना. रात्रीं पाहिलेल्या दृश्याच्या आठवणीनेंहि तो शिवशिवत होता.

समर्थांना त्यानें अखेरीस परवानगी मागितली आणि समर्थांनींहि ती कांबळी त्यास दिली. त्या वेड्याची कल्पना अशी कीं ती कांबळी सोडली, कीं ते दडून राहिलेले यमदूत आपणांला घेऊन जातील.

ती कांबळी घेऊन तो गेला. सर्व शुचिर्भूतता त्यानें त्या कांबळीच्या सांनिध्यांतच पार पाडली. नंतर गुरुजींकडे तो आला. तोंच समर्थांनीं सांगितलें––

ही झोळी घे, आणि कालच्याच ब्राह्मणाच्या घरीं जाऊन कालचाच श्लोक म्हणून भिक्षा माग. हवी असेल तर ही कांबळीहि घेऊन जा समवेत.

स्वामींची आज्ञा कोण अव्हेरील ? त्या शिष्यानें प्रणाम केला व तो भीत-भीतच निघाला. जेव्हां तो त्या घरापाशीं आला तेव्हां तो घाबरूनच गेलेला होता. कांबळीचा स्पर्शच काय तो त्याला धीर देत होता. त्यानें मोठ्यानें श्लोक म्हटला, आणि काय होतें तें पहाण्याच्या आंतच परत धूम ठोकली. पुनः शाप दिला तर ? विषाची परीक्षा कशाला ?

तो ब्राह्मण तडफडतच बाहेर आला. 'अजून कसा तूं जिवंत आहेस ?' असें तो म्हणाला देखील. पण त्याच्यासमोर कोण होतें ? तो शिष्य केव्हांच निघून गेलेला होता. त्याच्यासमोर उभे होते खुद्द समर्थ !

समर्थाचिया सेवका वक्र पाहे ।
असा सर्वभूमंडळीं कोण आहे ?

त्या ब्राह्मणाला विरक्ति उत्पन्न झाली. त्यानें त्या समर्थांपुढें आपली मान नम्र केली. तो त्यांचा शिष्य झाला. त्या 'मरणाऱ्या' शिष्याला अचंबाच वाटला. कांबळीच्याच प्रभावानें आपण वांचलों, असा त्याचा भ्रम होता. त्याचाहि आतां नीट निरास झाला. त्यालाहि हें समजून आलें कीं— नुपेक्षी कदा राम-दासाभिमानी.

---

## ( २ ) उद्योगाचे घरीं ऋद्धि सिद्धि पाणी भरी

जो उद्योग करतो त्याला अपार संपत्ति प्राप्त होत असते. उद्योगिनं पुरुषसिंह उपैति लक्ष्मीः, असें एक संस्कृत सुवचन आहे, त्याचाच भावार्थ वर शीर्षकांत दिलेला आहे. या ठिकाणीं उद्योग हें भाववाचक नाम उद्योगी माणूस या अर्थाच्या सामान्य नामाप्रमाणें योजिलेलें आहे.

आपणांला तर पुष्कळ वेळेला दिसतांना दिसत असतें कीं माणसें उद्योग करीत नाहींत आणि त्या ठिकाणीं तर 'श्रीमंत नांदती.' असें कसें ? पण हा विरोधाभास आहे. श्रीमंत असलेलीं आणि या वेळेस उद्योग करितांना न दिसणारीं अशी जीं माणसें दिसतात, तीं खरोखरीच अनुद्योगी राहून श्रीमंत झालेलीं

नसतात. त्यांनीं अगोदरच अविश्रांत श्रम केलेले असतात, आणि ते आज त्या श्रमाचीं फळें चाखत असलेलीं दिसून येत असतात. या वेळेस कदाचित् ते श्रम करीत नसतीलहि किंवा त्यांच्या श्रमाचें स्वरूप दिसून येत नसेल. पण त्यांची संपत्ति ही उद्योगावांचून निर्माण झाली आहे, असें म्हणतां येणार नाहीं : अनुद्योगेन तैलानि तिलेभ्यः नाप्तुमर्हति. श्रम जर केले नाहींत, तर तिळापासूनहि तेल प्राप्त होऊं शकणार नाहीं.

अशुद्ध मार्गानें पैसा मिळतो, पण तो उपभोगतां येत नाहीं किंवा फार काळ टिकतहि नाहीं. अनोखीलालनें लॉईडस् बॅंकेवर १२ लाखांसाठीं डाका घातला. पण त्याला ते १२ लाख उपभोगतांहि आले नाहींत किंवा पचवितांहि आले नाहींत. त्याच्या धाडसाचें आणि उद्योगाचें कौतुक करतां येईल. पण ते गुण अयोग्य ठिकाणीं अयोग्य रीतीनें योजिले गेले. उमाजी नाईकाच्या डाक्यांचा हेतु कितीहि उदात्त असला, तरी त्याचा मार्ग अशुद्ध असल्यानें त्यापासून कोणालाहि लाभ झाला नाहीं. काळ्या बाजारांत मिळविलेली संपत्ति राखतां राखतांच संपून जात असते; आणि वर चिंता असते ती निराळीच. काय त्या अगणित संपत्तीला घेऊन करावयाचें आहे ? लोक थुंकतात, चोर लुटतात, सरकार लुबाडतें — अशी संपत्ति नुसती शोभेची. ती संपत्तिच नव्हे. पण तशीहि संपत्ति मिळविण्यासाठीं केवढें कसब आणि केवढा उद्योग करावे लागत असतात ?

शुद्ध साधनें वापरून संपत्ति प्राप्त होत नाहीं, असें नाहीं. पण ती अगदीं मुंगीच्या गतीनें. आणि ती सांचत जाते, आणि ती वाढत जात असते. लहानशी मुंगी ! आपल्या वजनाच्या एकवीस पट असणारा गव्हाचा दाणा ओढत आपल्या वारुळांत सतत धडपडून नेत असते आणि असे शेंकडों दाणे जमवून ती आपल्या चार महिन्यांच्या पावसाळ्याची तजवीज करीत असते. लहानशी मुंगी ! इतका उद्योग करिते, कीं तिचें वारूळ म्हणजे एक मोठें कोठागारच होऊन जात असतें. लहानशी मुंगी ! मग एवढा मोठा सहा फुटांचा जाडाजुडा माणूस उद्योग करील, तर काय बरें करूं शकणार नाहीं ? खेंचून त्याला आणतां येईल संपत्ति.

श्रम अविश्रांत पाहिजेत, मार्ग शुद्ध पाहिजे, आणि दिशा योग्यच पाहिजे,

UC 20



तर यश प्राप्त होईल. उद्योगाची दिशा जर चुकलेली असेल, तर उद्योग कितीहि केला, तरी फल प्राप्त होणार नाहीं. दोन आणि दोन यांची बेरीज पांच केली, आणि गणित शंभर वेळेला केलें, तरी तें चुकणारच. तसेच संपत्तीच्या उद्योगाचें: कशानें संपत्ति प्राप्त होईल ? तें नीट हेरलें पाहिजे. आणि एकदां निश्चय झाला, कीं त्यासाठीं सतत झटत राहिलें पाहिजे. मुंबईंत ज्यांचें नांव अग्रभागीं शोभते, ते सर जमशेटजी टाटा—मूळ गरिबींत जन्म पावलेले. बाट-ल्यांचा धंदा त्यांनीं पत्करला. किती कष्ट पडतात, हें आपणाला येथें टेबलावर बसून समजणार नाहीं. त्यासाठीं उन्हातान्हांत हिंडलें पाहिजे. आणि सर टाटा तसें हिंडले. त्यांनीं अपरंपार संपत्ति मिळविली. त्यांना बाटलीवाला असेंच नांव प्राप्त झालें. त्यांच्या औदार्याच्या पुष्कळ गोष्टी मुंबईतील पुष्कळ संस्था सांगत आहेत. त्यांच्या संपत्तीची एक दंतकथा येथें देत आहे.

पूर्वीच्या काळीं फक्त गव्हर्नरलाच एक रंगाच्या चार घोड्यांच्या गाडींतून फिरण्याचा अधिकार असे. पण सर टाटांना असें वाटलें कीं आपणहि एक जात एकरंगी चार घोड्यांच्या गाडींतून फिरावें. त्यांनीं तसें केलेंहि. तोंच सरकारी हुकुमानें त्यांवर खटला भरण्यांत आला. 'सरकारचा अपमान केला,' हा आरोप ठेवण्यांत आला. सर टाटा त्याच चार घोड्यांच्या गाडींतून न्यायालयांत गेले. न्यायाधीशानें दंडाची शिक्षा सुनावली. पण सर टाटांना वाईट वाटलें असें दिसलें नाहीं. त्यांनीं ती दंडाची रक्कम तेथेंच चुकती केली आणि वर पुनः तितकीच रक्कम अधिक भरून सांगितलें कीं, 'एका अपराधाबद्दल मी ही किंमत दिली आहे, ही आणखी रक्कम पुनः तसल्याच कृत्यासाठीं मी आगाऊ भरीत आहे.' आणि ते त्याच गाडींतून घरीं परत आले. केवढा हा संपत्तीचा प्रभाव. ऋद्धि सिद्धि पाणी भरी.

REFBK-0007920

क्रमांक ८५८

नों. दि. २५/१२/५७